अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १६२ । गुरूवार २६ मार्च २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com




# शक्ती कायदा मंजूर

## महिला सुरक्षेला अधिक बळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण ठरणारे 'भारतीय न्याय संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक २०२६' अर्थात सुधारित 'शक्ती कायदा' विधानपरिषदेत एकमताने मंजूर करण्यात आले. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या विधेयकाला यश मिळाल्याचे मानले जात आहे.

या विधेयकावर सभागृहात सखोल चर्चा करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, महिलांवरील अत्याचारांना पायबंद घालण्यासाठी 'शक्ती कायदा' अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने सरकार पूर्णपणे कटिबद्ध आहे. मुळात, राज्य सरकारने २०२३ मध्येच 'शक्ती कायदा' केंद्राच्या मान्यतेसाठी पाठवला होता, मात्र त्याच काळात देशात नवीन फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी प्रक्रिया सुरू झाल्याने या प्रस्तावाला तात्पुरती स्थगिती मिळाली होती. ही तांत्रिक अडचण ओळखून डॉ. नीलम गोऱ्हे यांनी १४ डिसेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्र्यांना एक सविस्तर निवेदन सादर केले होते. त्यात त्यांनी केंद्र सरकारची 'भारतीय न्याय संहिता' आणि राज्यातील प्रस्तावित 'शक्ती कायदा' यांच्यातील तफावत दूर करण्याची आग्रही मागणी केली होती.



**भारतीय न्याय संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक २०२६' ला मंजुरी मिळाल्याबद्दल डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे विशेष आभार मानले आहेत. या कायद्यामुळे आता गुन्हेगारांवर जरब बसेल आणि महिलांना जलद न्याय मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.**

डॉ. गोऱ्हे यांच्या या मागणीची दखल घेत सरकारने नवीन विधेयकात अनेक क्रांतिकारी सुधारणांचा समावेश केला आहे. विशेषतः ॲसिड हल्ला पीडितेची ओळख गोपनीय ठेवणे आणि डिजिटल माध्यमांतून महिलांवरील होणाऱ्या गुन्ह्यांविरोधात कठोर तरतुदींचा समावेश केल्याने हा कायदा आता अधिक धारदार झाला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या सुधारणांची गरज अधोरेखित करत, हे विधेयक विधानपरिषदेतही एकमताने मंजूर करण्याची विनंती केली, ज्याला सर्वच सदस्यांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला.

या संपूर्ण प्रक्रियेत डॉ. नीलम गोऱ्हे यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. त्यांनी केवळ विधानमंडळातच नव्हे, तर प्रशासकीय पातळीवरही या विषयाचा पाठपुरावा केला. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांनी पोलीस महासंचालक सदानंद दाते आणि माजी न्यायमूर्ती साधना जाधव यांच्यासह विधान भवनात घेतलेली उच्चस्तरीय बैठक या कायद्याला अंतिम स्वरूप देण्यासाठी दिशादर्शक ठरली. कायद्याची अंमलबजावणी केवळ कागदावर न राहता ती प्रभावी, पारदर्शक आणि संवेदनशील असावी, यावर त्यांनी नेहमीच भर दिला आहे.



## प्रभू श्रीरामाचा आदर्श अंगीकारावा

श्रीरामांचे जीवन अत्यंत शुद्ध आणि निर्मल होते. त्यांनी आपल्या पत्नीसाठी सर्व सुखांचा त्याग केला होता. जेव्हापासून त्यांची पत्नी वनवासात राहिली किंवा जेव्हा त्यांना एकटे राहावे लागले आणि जेव्हा त्यांनी तिचा त्याग केला, तेव्हा त्यांनी जगातील सर्व विलासी गोष्टी सोडून दिल्या होत्या. तुम्हाला माहीतच असेल की, त्यासाठी ते दर्भावर (कुश/गवत) किंवा जमिनीवर झोपत असत. पायात काहीही न घालता आणि एखाद्या साधू पुरुषासारखे साधे कपडे परिधान ते वावरत असत.

ह्या केवळ कथा नाहीत, तर हे सत्य आहे. आपल्या या भारतवर्षात असे अनेक थोर पुरुष होऊन गेले आहेत, ज्यांचे जीवन अतिशय उच्च दर्जाचे होते आणि त्यांनी कधीही क्षुद्र किंवा हीन विचार केला नाही.

परंतु, हे सर्व आदर्श आपल्या देशात असूनही एक मोठी समस्या निर्माण झाली आहे. जेव्हा आपण या आदर्शांकडे पाहतो, तेव्हा आपल्याम ध्ये एक प्रकारचा ढोंगीपणा शिरला आहे. आपल्याला वाटते की, राम तर आमचेच आहेत, आम्ही रामाला मानतो. आपण रामाचे भजन केले की आपले काम संपले, असे आपल्याला वाटते. हा एक प्रकारचा दिखाऊपणा आपल्यात आला आहे.

ज्या देशांमध्ये असे महान आदर्श नाहीत, ते लोक स्वतःला आदर्श कसे बनवता येईल आणि स्वतःमध्ये सुधारणा कशी करता येईल, याचा प्रयत्न करतात. पण आपल्यासमोर तर श्रीराम स्वतः आदर्श म्हणून उभे आहेत, आणि तरीही आपण असा विचार करतो की, आम्ही काही श्रीराम होऊ शकत नाही.

## अखेर शिर्डीत खरात विरोधात बलात्काराचा गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** अश्लील फोटो दाखवून पाच कोटी रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी एका तरुणीने दिलेल्या तक्रारीवरून खरात यांच्या कार्यालयातील कर्मचारी नीरज जाधव याच्याविरुद्ध शिर्डी पोलीस ठाण्यात दिनांक १८ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे.



सदर तरुणीने पुढे कॅप्टन खरात यांच्याविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल केला असून, आतापर्यंत एकूण सात बलात्काराच्या गुन्ह्यांची नोंद झाल्याची माहिती समोर आली आहे.

शिर्डीतील तरुणी ही कॅप्टन खरात बाबाची भक्त होती.तिचे व परिवाराचे खरात याच्याशी घरोब्याचे संबंध होते .ती तरुणी खरातच्या संपर्कात आल्यानंतर तिने तिच्या करिअर विषयी व आपल्या जमिनीमध्ये बंगला बांधण्यासाठी योग्य जागा सुचवण्याविषयी खरात याचे कडे विचारणा केली होती .तिने खरात बाबावर ठेवलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन खरात याने तिला (पान ४ वर)

### अब सीआयटी शिर्डी से दूर नही

शिर्डीतील तरुणीने खराब बाबा बलात्काराचा गुन्हा दाखल झाल्याने तसेच शिर्डी साकुरी काकडी अशा असंख्य गावामध्ये भूखंड घेऊन ठेवली असून त्याचे अनेक महिलांशी व येथील अनेक जणांशी संपर्क आलेले आहेत. खरात ने कुणाकुणाची शिर्डी परिसरात संबंध प्राप्त करून मोठ्या प्रमाणात माया जमवली याचाही तपास होणार असल्याने यासाठी शिर्डी कधी येऊन धडकेल याचा नेम राहिलेला नाही तेव्हा 'अब एसआयटी शिर्डी से दूर नही' असेच म्हणावे लागेल.

## २०३५ पर्यंत एसटी पूर्णपणे इलेक्ट्रिक करणार : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : राज्याच्या पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, 'महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५' अंतर्गत २०३५ पर्यंत राज्य परिवहन (एसटी) महामंडळाचा संपूर्ण बस ताफा इलेक्ट्रिक करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय शासनाने घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत दिली.

**■ या निर्णयामुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळण्याबरोबरच एसटी महामंडळाच्या आर्थिक स्थितीतही सुधारणा होईल. हरित ऊर्जेमुळे इंधन व देखभाल खर्चात बचत होऊन दीर्घकालीन टिकाऊपणा साध्य होणार आहे. तसेच ई-मोबिलिटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊन महाराष्ट्र देशात अग्रस्थानी राहील, असा विश्वासही मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.**




नियम २६० अंतर्गत मांडलेल्या प्रस्तावावर बोलताना मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, वाढते वायूप्रदूषण, इंधन दरातील चढ-उतार आणि जागतिक हवामान बदल यांचा विचार करता इलेक्ट्रिक वाहनांचा वापर ही काळाची गरज ठरली आहे. सुमारे १४ हजार बसचा ताफा असलेली एसटी ही ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी असून, या सेवेचे रूपांतर हरित ऊर्जेवर करण्याचा शासनाचा विचार आहे.

या धोरणाअंतर्गत नागरिकांना इलेक्ट्रिक वाहन खरेदीसाठी कर सवलती देण्यात येणार असून, टोल माफीमुळे प्रवास खर्चात बचत होणार आहे. तसेच राज्य व राष्ट्रीय महामार्गांवर दर २५ किलोमीटर अंतरावर चार्जिंग सुविधा उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. चार्जिंग पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन देण्यात येणार असून, संशोधन, नवकल्पना आणि कौशल्य विकासाला चालना दिली जाणार आहे.

चार्जिंग स्टेशनसाठी सौर ऊर्जेचा वापर करण्यावर विशेष भर देण्यात येणार असून, ऊर्जा निर्मितीपासून वापरापर्यंत संपूर्ण प्रक्रिया पर्यावरणपूरक करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.




## रामनवमी निमित्त श्रीरामपूरच्या राम मंदिरात आकर्षक रोषणाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : रामनवमीच्या निमित्ताने शहरातील राम मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. रंगीबेरंगी दिव्यांनी सजवलेल्या मंदिराने भाविकांचे लक्ष वेधून घेतले.

रामनवमीच्या पावन दिवशी मोठ्या संख्येने भाविक भक्त दर्शन घेतात. यावेळी विशेष पूजाअर्चा व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रोषणाईमुळे संपूर्ण मंदिर परिसर उजळून निघाला असून भाविकांनी याचा आनंद लुटला.

## महत्त्वाचे..

### विमान अपघात प्रकरणी सीबीआय चौकशीची मागणी

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी तपासाला गती देण्यासाठी केंद्र सरकारकडे सीबीआय चौकशीची मागणी करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. अपघातामागे कट किंवा घातपात असल्यास दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

विमान अपघात अन्वेषण ब्युरो (अअखइ) चा अंतरिम अहवाल सरकारला प्राप्त झाला असून, त्यानुसार बारामती विमानतळावरील आधुनिक उपकरणांचा अभाव आणि कमी दृश्यमानता ही अपघाताची प्राथमिक कारणे असल्याचे समोर आले आहे. विमानात स्फोटक किंवा विषारी पदार्थ आढळले नसल्याचे तसेच वैमानिकाचा अल्कोहोल तपासणी अहवालही सामान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अपघातातील मृत्यू गंभीर जखमा व भाजल्यामुळे झाल्याचे शवविच्छेदन अहवालातून स्पष्ट झाले आहे. दरम्यान, कर्नाटक सरकारने दाखल केलेल्या एफआयआरवर मुख्यमंत्र्यांनी टीका करत नियमानुसार प्रथम अपघाती मृत्यू नोंदवणे अपेक्षित असल्याचे सांगितले. राज्यातील कायदा-सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी 'महानेत्र' धोरण राबविण्यात येणार असून, सीसीटीव्ही यंत्रणा एकत्रित करण्याचा निर्णयही त्यांनी जाहीर केला.

## अशोक खरातच्या प्रॉपर्टीत गुंतवणूक...

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

### उपजिल्हाधिकाऱ्यांची तडकाफडकी बदली

**नाशिक** : भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आता राजकारण्यांच्या नंतर शासकीय अधिकारी अडचणीत आल्याचं दिसून आलं. या प्रकरणात आता मुंबईत उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याची बदली करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. अभिजीत भांडे पाटील असं त्या अधिकाऱ्याचं नाव आहे. त्यांची प्रतिनियुक्ती संपुष्टात आणून मंत्रालयात बदली करण्यात आली आहे. शेकडो महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप असलेल्या अशोक खरातमुळे रुपाली चाकणकर यांच्यासह अनेक राजकारणी अडचणीत आल्याची चर्चा (पान ४ वर)

## गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी नवे प्राधिकरण स्थापन करणार : मंत्री ॲड. आशिष शेलार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : राज्यातील गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी व्यापक पावले उचलली जात असून युनेस्को मानांकन मिळालेल्या गडकिल्ल्यांच्या व्यवस्थापनासाठी तसेच असंरक्षित किल्ल्यांच्या जतनासाठी स्वतंत्र किल्ले संवर्धन प्राधिकरण स्थापन करणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा नियम २९३ अन्वये सांस्कृतिक कार्य विभागासंदर्भात झालेल्या चर्चेला उत्तर देताना सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले, मराठा मिलिटरी लँडस्केप ऑफ इंडिया या संकल्पनेअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गडकिल्ल्यांना युनेस्कोचे जागतिक मानांकन मिळाले आहे. या किल्ल्यांसाठी स्थळ व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येत असून माहिती फलक, जनसुविधा केंद्र, माहिती केंद्र आणि पर्यटन सुविधा उभारण्याचे काम हाती घेतले जाणार आहे.

इतिहास जतन करण्याच्या दृष्टीने नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक रघुजी भोसले प्रथम यांची ऐतिहासिक तलवार लिलावातून खरेदी करण्यात आली असून ती (पान ४ वर)

## हवामान बदलामुळे महाराष्ट्रातील कुपोषणाच्या समस्येत वाढ

### मातेच्या पोषणाला प्राधान्य देण्याचे 'युनिसेफ'चे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नागपूर** : राज्यात वाढते तापमान, दुष्काळ आणि कृषी क्षेत्रावर वारंवार येणारी संकटे यामुळे कुपोषणाची समस्या अधिकच गंभीर होत चालली आहे. सर्वाधिक चिंता गर्भावस्थेतील त्या निर्णायक काळाची आहे, जेव्हा बाळाच्या मेंदूचा पाया घातला जातो; हवामान बदल आणि अपुरा आहार यांचा थेट फटका गर्भवती महिलांना बसत असून त्याचे दीर्घकालीन परिणाम पुढील पिढीवर उमटण्याचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर 'मातेच्या पोषणाला' सर्वोच्च प्राधान्य देणे अत्यावश्यक असल्याचे आवाहन युनिसेफने केले आहे.

युनिसेफ-इंडिया आणि केंद्र सरकारच्या पत्र सूचना कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, २५ मार्च रोजी आयोजित एका विशेष क्षमता निर्मिती कार्यशाळेत या प्रश्नावर



चर्चा करण्यात आली. हवामान बदलामुळे अन्नधान्याच्या किमती वाढत आहेत, ज्यामुळे आहारातील वैविध्य कमी होत आहे. याचा सर्वाधिक फटका महाराष्ट्रातील आदिवासी भाग, शहरी झोपडपट्ट्या आणि कृषीप्रधान जिल्ह्यांतील गर्भवती महिलांना बसत असल्याचे निरीक्षण या कार्यशाळेत नोंदवण्यात आले.

कुपोषणामुळे बाळाच्या जन्मानंतर त्याला आयुष्यभरासाठी मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि मानसिक आजार जडण्याची भीती असते. याविषयी बोलताना महाराष्ट्रआरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या माजी उपकुलगुरू व युनिसेफच्या ज्येष्ठ सल्लागार डॉ. मृदुला फडके म्हणाल्या, जेव्हा एखादी गर्भवती महिला आहारविषयक असुरक्षितता किंवा शारीरिक तणावाला सामोर जाते, तेव्हा केवळ तिच्याच नव्हे, तर तिच्या बाळाच्या संपूर्ण आयुष्यभराच्या आरोग्याला धोका निर्माण होतो.

सेवाग्राम येथील एमजीआयएमएस संस्थेचे डॉ. सुबोध एस. गुप्ता यांनी स्पष्ट केले की, पोषण, हवामानविषयक असुरक्षितता आणि असंसर्गजन्य आजार हे परस्परांशी जोडलेले आहेत. (पान ४ वर)

### राज्यात ६० लाख मुले प्रभावित

**राज्यात सध्या बाल्यावस्थेतील असंसर्गजन्य आजार ही एक मोठी आणीबाणी बनत चालली आहे. पूर्वी केवळ प्रौढांमध्ये आढळणारे मधुमेह, दमा, जन्मजात हृदयरोग आणि स्थूलता यांसारखे आजार आता लहान मुलांमध्ये वेगाने वाढत असून, राज्यातील तब्बल ६० लाखांहून अधिक मुलांवर याचा परिणाम होत आहे. यावर योग्य वेळी उपाययोजना आवश्यक आहेत.**

## खरात प्रकरणाची चौकशी झाली तर अनेक मंत्री अडचणीत येतील : सपकाळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई** : भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरून राज्याच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोपांना वेग आला असून, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी गंभीर आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी झाल्यास डझनभर मंत्री व दोन डझन अधिकारी अडचणीत येऊ शकतात, असा दावा केला आहे.

सपकाळ यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, २०१८ साली देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने खरात यांच्या इशानेश्वर मंदिरासाठी निधी मंजूर केला होता. तसेच काही वरिष्ठ अधिकारी व राजकीय व्यक्तींशी या बाबाचे संबंध असल्याचा आरोप त्यांनी केला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह व राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांचेही या संदर्भातील फोटो समोर आल्याचा दावा त्यांनी केला आहे. याशिवाय, मुख्यमंत्रीपदासाठी अघोरी पूजा करण्यात आल्याचेही त्यांनी म्हटले असून, या सर्व बाबींची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, या आरोपांबाबत संबंधितांकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नसून प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

## संपादकीय

# लोकशाहीतील समता: महिला आरक्षण आणि संसदेचा विस्तार

भारतीयलोकशाहीप्रणालीतघटनाकारांनीसत्तेच्याविकेंद्रीकरणाबरोबरच लिंगभाव समानतेला महत्त्वाचे स्थान दिले आहे. गाडा राष्ट्राचा असो की संसाराचा, 'तो' आणि 'ती' या दोन्ही चाकांना समान वेगाने धावावे लागते, तेव्हाच अपेक्षित ध्येय गाठता येते.

स्वातंत्र्यप्राप्तीला ७५ वर्षांहून अधिक काळ लोटला तरी समाजमन हा समतेचा विचार पूर्णपणे स्वीकारू शकलेले नाही, हे कटू वास्तव आहे. प्रत्येक निवडणुकीत 'ती'चे असणे फक्त घोषणेचा विषय राहिले. ती जिंकली तरी अधिकार मनापासून स्वीकारले जात नाहीत. आता केंद्र सरकार संसद आणि राज्य विधिमंडळांत महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी दोन विधेयके सादर करण्याच्या विचारात आहे. यासाठी विरोधकांशी चर्चा सुरू झाली आहे. घटनादुरुस्तीच्या मार्गाने हे गणित जुळवावे लागेल. अंमलबजावणी झाल्यास देशाचे राजकीय चित्र आमूलाग्र बदलू शकते.सध्याच्या ५४३ सदस्यांच्या लोकसभेची संख्या ८१६ पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे. त्यात २७३ जागा (एक तृतीयांश) महिलांसाठी राखीव ठेवल्या जातील. महाराष्ट्रात सदस्य संख्या ४८ वरून ७२ पर्यंत जाईल. उत्तर प्रदेश ८० वरून १२०, बिहार ४० वरून ६०, तमिळनाडू आणि केरळमध्येही अनुपातिक वाढ होईल. बहुमताचा आकडा ४०९ पर्यंत जाईल. या विस्तारामुळे 'ती'चे राजकीय अस्तित्व घटनात्मक चौकटीत बळकट होईल. सरकारला दोन हेतू साध्य होतील: आगामी राज्य निवडणुकांत महिला सक्षमीकरणाचा डांगोरा पिटता येईल आणि २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत हे 'कार्ड' वापरता येईल. भाजपसाठी उत्तर भारतकेंद्री 'होमपीच' अधिक शक्तिशाली होण्याची संधी निर्माण होईल.

जनगणनेमुळे अपेक्षित राजकीय बदल महत्त्वाचे आहेत. २०२३ च्या महिला आरक्षण कायद्यानुसार (१०६ वी घटनादुरुस्ती) आरक्षण जनगणना आणि परिसीमनानंतर लागू होणार होते. आता सरकार २०११ च्या जनगणनेच्या आधारे परिसीमन करून आरक्षण त्वरित अमलात आणण्याचा विचार करत आहे. यामुळे उत्तर भारतातील लोकसंख्या-आधारित राज्ये (उत्तर प्रदेश, बिहार) अधिक जागा मिळवतील, तर दक्षिणेकडील राज्ये (तमिळनाडू, केरळ, कर्नाटक) तुलनात्मकदृष्ट्या मागे राहतील. लोकसंख्या नियंत्रण करणाऱ्या राज्यांना 'शिक्षा' मिळते, असा दक्षिणेकडील नेत्यांचा आक्षेप आहे. निधिवाटपातही अन्याय होतो. प्रस्तावित ८१६ जागांच्या विस्तारात उत्तर प्रदेश १२०, महाराष्ट्र ७२, पश्चिम बंगाल ६३ जागा मिळू शकतात. दक्षिणेकडील राज्यांची संख्या वाढेल, पण भौगोलिक विस्तार आणि लोकसंख्या पाहता त्यांचा वाटा तुलनात्मकदृष्ट्या कमी राहील. यामुळे संघीय ढांच्यात तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. दक्षिणेकडील राज्ये लोकसंख्या नियंत्रणासाठी बक्षीस मागतात, तर उत्तर भारत विकास आणि प्रतिनिधित्वाची मागणी करतो. जनगणना वेळेवर झाली असती तर ही कोंडी टाळता आली असती.

महिला आरक्षणाचे सकारात्मक परिणाम दूरगामी असतील. स्थानिक स्वराज्य संस्थांत ५० टक्के आरक्षण असूनही खरी सत्ता पुरुषांच्या हातात राहते. बाईला हारतुरे आणि सत्कारापुरतेच मर्यादित ठेवले जाते. संसदेत ३३ टक्के आरक्षणाने राजकीय नेत्यांचा जन्म स्थानिक स्तरावरून होईल आणि गुणात्मक बदल घडेल, अशी अपेक्षा आहे. तरीही प्रश्न उरतो: 'ती' संसदेत गेल्यानंतर परिस्थिती आमूलाग्र बदलेल का? सध्याच्या राजकीय वर्गाला आरक्षण लागू करणे जमले नाही, हे अपयश नोंदवावेच लागेल. आरक्षण १५ वर्षांसाठी असेल, त्यानंतर वाढवता येईल. अनुसूचित जाती-जमातींसाठी राखीव जागांमध्येही महिलांचा समावेश होईल.या सुधारणेसोबत आव्हाने मोठी आहेत. संसद आणि विधिमंडळांच्या संख्यात्मक विस्तारामुळे खर्च वाढेल. नव्या संसद भवनात वाढीव सदस्यांचा विचार झाला, पण राज्य विधानभवनांचा विस्तार करावा लागेल. अनुसूचित जाती-जमातींच्या राखीव मतदारसंघांचे गणित बदलेल. भाजपप्रणित एनडीएला लोकसभा-राज्यसभेत बहुमत असले तरी घटनादुरुस्तीसाठी दोन तृतीयांश बहुमत आवश्यक आहे. विरोधकांची साथ गरजेची आहे. २०२३ च्या विशेष अधिवेशनात विधेयक मंजूर झाले, पण विरोधकांनी जनगणनेच्या मुद्द्यावर आक्षेप घेतला. आता २०११ च्या जनगणनेचा आधार घेण्याचा विचार आहे, त्यालाही विरोध आहे. सर्वपक्षीय चर्चा अनाठायी नाही. चर्चेतूनच सुधारणा मार्गी लागावी.

केवळ संख्यात्मक वाढ गुणात्मक सुधारणा घडवणार नाही. आज स्थानिक स्वराज्यात ५० टक्के आरक्षण असतानाही सत्ता पुरुषांच्या हातात एकवटली आहे. राजकीय पक्षांना महिलांना उमेदवारी देण्यात खरा रस दाखवावा लागेल. प्रशिक्षण, आर्थिक मदत आणि पक्षांतर्गत लोकशाही यांची गरज आहे. दक्षिणेकडील राज्यांच्या तक्रारी गांभीर्याने घ्याव्या लागतील. लोकसंख्या नियंत्रण करणाऱ्या राज्यांना शिक्षा नको, तर बक्षीस मिळावे. निधिवाटपात समानता राखावी. पायाभूत सुधारणा, शिक्षण आणि आरोग्यावर भर देऊन उत्तर भारतातील लोकसंख्येचा वेग नियंत्रित करावा.

लोकशाहीतील संख्यात्मक सुधारणांना गुणात्मक जोड द्यावी लागेल. महिला सक्षमीकरण हा केवळ राजकीय सोयीसाठीचा मुद्दा नसावा, तर समतेचा मूलभूत हक्क आहे. केंद्र सरकारने विरोधकांना विश्वासात घेऊन पावले टाकावीत. 'आम्ही सांगू तीच दिशा' असे धोरण चालणार नाही. सर्वपक्षीय सहमतीने ही ऐतिहासिक संधी साधली तर भारतीय लोकशाही अधिक समावेशक आणि मजबूत होईल. 'ती'ची उपस्थिती केवळ संख्या नसून, धोरणे, निर्णय आणि समाजमानस बदलणारी शक्ती बनेल. तेव्हाच राष्ट्र आणि संसार दोन्ही चाके समान वेगाने पुढे जातील.

# अमृतफेस्ट २K२६ अंतर्गत प्रोजेक्ट स्पर्धेत विद्यार्थ्यांची नवकल्पनांची झेप



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** अमृतवाहिनी पॉलिटेक्निकमध्ये अमृतफेस्ट २K२६ अंतर्गत आयोजित प्रोजेक्ट स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत २६१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढविण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अहिल्यानगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पुणे व मुंबई येथील विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात सहभाग घेतला. उद्घाटन प्रसंगी कार्यकारी विश्वस्त शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, अकॅडमी डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य प्रा. व्ही. बी. धुमाळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी शरयूताई देशमुख यांनी एआय तंत्रज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेतले पाहिजे, असे सांगितले. तर डॉ. गुरव यांनी संस्थेच्या गुणवत्ता पूर्ण वाटचालीचा आढावा घेतला. स्पर्धेत मेकॅनिकल, सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर, आयटी आदी शाखांतील विद्यार्थ्यांनी ऑटोमेशन, रोबोटिक्स, नवीकरणीय ऊर्जा, सॉफ्टवेअर व ॲप डेव्हलपमेंटवर आधारित प्रकल्प सादर केले. विशेषतः आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित प्रकल्पांनी लक्ष वेधले. उत्कृष्ट प्रकल्पांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. आयोजनासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# हर्षवर्धन सदगीरला शरद पवारांकडून १२ लाखांची शिष्यवृत्ती

## काका पवार यांच्या तालमीला ५० लाखांचे आर्थिक सहाय्य



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

पुणे : खासदार व कुस्ती क्षेत्राचे आश्रयदाते शरद पवार साहेब यांनी डबल महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीरला १२ लाख रूपयांची शिष्यवृत्ती तर काका पवार यांच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल,पुणे या संकुलसाठी ५० लाख रुपयेंचे बक्षिस दिले आहे. मुंबईत हर्षवर्धन सदगीरसह अर्जून पुरस्कार विजेते काका पवार यांनी शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी उद्योजक श्री मोहसीन बागवान, कुस्ती प्रशिक्षक शिवाजी कोळी सर महाराष्ट्र चॅम्पियन पृथ्वीराज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. हर्षवर्धन सदगीर यांचे कौतुक करीत ऑलिम्पिकपटू होण्यासाठी पुढील २ वर्षांसाठी महिना ५० हजार प्रमाणे १२ लाखांचे शिष्यवृत्ती धनादेश दिला आहे. काका पवार यांच्या तालमीतील हर्षवर्धनसह ११ मल्लांनी पदकाची लयलुट केल्याबद्दल आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलला ५० लाख रूपयांचे शरद पवार यांनी आर्थिक सहाय्य दिले आहे. शरद पवार यांचे आभार व्यक्त करीत काका पवार म्हणाले की, पवार हे खेळाडूंसाठी तारणहार व आधार आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांचे आम्ही सर्व पहिलवान व खेळाडू कायम ऋणी आहोत. पवार यांनी केवळ घोषणाच केली नाही तर धनादेश देऊन वेळीच विजेत्यांचे व प्रशिक्षण केंद्राचे कौतुक केले आहे. क्रिकेटनंतर इतक्या वेगाने पवार हेच कुस्तीगीरांसाठी अनेकदा धावून आले आहेत.

**शासनाकडून नोकरीचे आश्वासन**

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही काक पवार व हर्षवर्धन सदगीर यांनी भेट घेतली. त्यावेळी येत्या अधिवेशनात नाशिक महानगरपालिकेत नोकरी देण्याचे आश्वासन एकनाथ शिंदे यांनी दिली असल्याचे काका पवार यांनी सांगितले आहे.**

# कृत्रिम बुद्धिमत्तेने भविष्याचा वेध शक्य : पद्मश्री प्रतापराव पवार



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता ही भविष्यातील जग घडविणारी महत्त्वाची शक्ती ठरत असून तिच्या माध्यमातून जीवन अधिक सोपे, वेगवान व स्मार्ट बनविता येते, असे प्रतिपादन पद्मश्री प्रतापराव पवार यांनी केले. 'पद्मश्री प्रतापराव पवार न्यू एज स्किल सेंटर'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही प्रणाली अनुभवातून शिकत निर्णय घेते, मोठ्या प्रमाणावर डेटा विश्लेषण करून भविष्यातील अंदाज व्यक्त करते व उद्योग, शिक्षण व आरोग्य क्षेत्रात नवे बदल घडवते, असे पवार यांनी सांगितले. ग्रामीण भागातील युवकांना माहिती तंत्रज्ञानाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी या स्किल सेंटरची उभारणी करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी प्रमुख अतिथी चंद्रकांत दळवी यांनी रयत शिक्षण संस्थेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून होत असलेल्या शैक्षणिक बदलांचा आढावा घेतला. आधुनिक तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात मीनाताई जगधने यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला, तर विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेवरील विविध प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी विविध मान्यवरांच्या हस्ते वसतिगृह, भोजन कक्ष व अभ्यासिकेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उंबरेश्वर देवस्थान घाट रस्ता पूर्ण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील खळी परिसरातील पंचक्रोशीचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र उंबरेश्वर देवस्थानाकडे जाणारा घाट रस्ता नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून पूर्ण झाला आहे. उंच डोंगरावर वसलेल्या या देवस्थानापर्यंत पूर्वी कोणतीही वाहतूक सुविधा नसल्याने ग्रामस्थ व भाविकांना डोंगरदऱ्यातून पायपीट करावी लागत होती. देवस्थानाचे मठाधिपती महंत दत्तगिरी महाराज व ग्रामस्थांनी घाट रस्त्याची मागणी केल्यानंतर पालकमंत्री विखे पाटील यांनी तात्काळ ३० लाख रुपयांची मंजुरी देत काम सुरू करण्याचे आदेश दिले होते. आता हा रस्ता पूर्ण झाल्याने खरशिंदे, खांबे, वरवंडी, वरशिंदे, चौधरवाडी आदी गावांतील नागरिक, विद्यार्थी व कामगारांना लोणी परिसरात जाण्यासाठी सोयीचा मार्ग उपलब्ध झाला आहे. दरम्यान, चैत्र महिन्यात होणाऱ्या सात दिवसांच्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी यंदा भाविकांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच घाटाच्या वरच्या भागाचे डांबरीकरण लवकर करावे, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली आहे. या कामाची पाहणी करताना स्थानिक कार्यकर्ते व ग्रामस्थांनी पालकमंत्र्यांचे आभार मानले.

**भाविकांसाठी सोयीसुविधा वाढल्या**



# बुवासाहेब महाराज यात्रा कमेटीच्या अध्यक्षपदी तोडमल तर उपाध्यक्षपदी भांड व शिंदे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील राहुरी खुर्द येथील जागृत देवस्थान बुवासाहेब महाराज यात्रा कमेटीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ नागरीक गेणूभाऊ तोडमल यांची तर उपाध्यक्षपदी गणेश भांड व सागर शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली. खजिनदार पदी भाऊराव शेडगे यांची सह खजीनदारपदी साहेबराव मोरे यांची निवड करण्यात आली.

राहुरी खुर्द येथील जागृत देवस्थान बुवासाहेब महाराज यांच्या यात्रा कमेटीच्या उत्सव समितीच्या कार्यकरिणी नेमणुकीच्या नियोजन बैठकीचे आयोजन बुवासाहेब मंदिराच्या सभामंडपात करण्यात आले होते, या बैठकीचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरीक मारुती शेडगे हे होते यावेळी साहेबराव मोरे यांनी मागील वर्षाच्या हिशोबाचे वाचन करून शिल्लक रक्कमेचे ग्रामस्था समोर वाचन करण्यात आले. त्यानंतर यात्रा कमेटीची कार्यकारिणी सर्वानुमते ठरवून वरील निवडी जाहीर करण्यात आली.







यावेळी युवक वर्गाकडून डीजे वाजविण्याची परवानगी मिळवण्यासाठी यात्रा कमेटीने सहकार्य करावे अशी मागणी करण्यात आली.अध्यक्ष गेणूभाऊ तोडमल यांनी पारंपरीक वाद्य म्हणजे सनई, डोल ताशा, झांज पथक, बॅन्ड पथक आदि वाद्य वाजविण्याचा आग्रह करुण डीजेसाठी पोलीस विभागाच्या परवानगीसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. प्रस्ताविक डॉ. तनपुरे सह साखर कारखान्याचे माजी संचालक नंदकुमार डोळस यांनी आभार मानले अध्यक्ष गेणूभाऊ तोडमल यांनी जत्रा शांततेत पार पाडावी त्यांचे मत मांडले, बैठकीत ग्रामपंचायत सदस्य राम तोडमल, अमोल डोळस, यांसह ज्येष्ठ नागरीक साहेबराव धोत्रे, निसारभाई शेख, ज्ञानदेव तोडमल, भगवान बाबा पतसंस्थेचे चेअरमन श्री दिलीपराव आघाव, पप्पू पाटोळे, उमाकांत घोरपडे, आकाश शेटे, सुनिल कुमावत, बाबासाहेब पोपळघट, नरेंद्र शेटे,गोरख ससाणे, प्रशांत डोळस,चेतन घोरपडे, यश गोल्हार, निखिल राऊत, बबलू पाटोळे, आशुतोष खाचणे, राजेंद्र खोजे, सुनिल तोडमल, एकनाथ माळी ,दिलीप क्षीरसागर, प्रशांत चोपडे मनोज गरड,संजय डोळस, यांसह पत्रकार भिमराज गुंड अशोक मंडलिक, यांसह असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते,

# धर्मांधता समाजाला घातक : डॉ.अशोक ढगे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** धर्मांधता समाजाला घातक असून त्यासाठी डोळसपणा वाढीसाठी युवकांनी पुढाकार घ्यावा व याबाबत जनजागृती करावी असे आवाहन कृषी शास्त्रज्ञ डॉ.अशोकराव ढगे यांनी केले आहे प्रतिनिधीशी संवाद साधतांना डॉ.ढगे म्हणाले की ना. डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांची भोंदू बाबा संदर्भीय विधाने स्पष्ट व सडेतोड भूमिका निश्चितच योग्य वाटते. महाराष्ट्रामध्ये आजच्या प्राप्त स्थितीत भोंदू बाबा अशोक खरात याच्या अघोरी कृत्याबद्दल सर्वसामान्यांना धक्का बसला आहे. हिंदू धर्म परंपरेने तात्विक व वैचारिक दृष्ट्या महान आहे तथापि धर्माचा गैरवापर करून अनेक भोंदू बाबा समाजाशी दिशाभूल करू अनैतिक कृत्य करून धर्माला बदनाम करतात त्यामुळे समाजाने धर्मांध होऊ नये. सध्या समाज अतिशय गतिमान झाला आहे त्यामुळे अशा महाराजांच्या वाईट कृत्याबद्दल माहिती समाजासमोर येत नाही महाराजांचे शिष्य गण स्वार्थासाठी फक्त चांगली बाजू समाजासमोर भडकपणे मांडतात त्याचा गैरफायदा भोंदू बाबा घेतात निश्चितच काही आजच्या काळात साधुसंत चांगले कार्य करत आहे समाजामध्ये वैचारिक प्रदूषण होत असून त्यामुळे अत्याचार अनाचार दुराचार व बलात्कार घडत आहेत त्यामुळे समाजकारणासाठी समाजाला योग्य दिशा देण्यासाठी हरी भक्त परायण महाराजांची गरज असून त्यांचे कार्य तात्विक व मौलिक विचार उल्लेखनीय आहेत. तथापि डोळसपणा समाजामध्ये असणे गरजेचे असून त्यासाठी युवकांनी काम केले पाहिजे अंधश्रद्धा निर्मूलन समिती तसेच जादूटोणा कायदा यासाठी युवकांनी पुढाकार घेऊन विविध उपक्रम राबविले पाहिजेत असे प्रतिपादन डॉक्टर अशोकराव ढगे यांनी केले

# श्रीराम साधना आश्रमात पंचदिनात्मक सोहळा, भास्करगिरी बाबांची भेट



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील मुकींदपूर येथील रामनगर परिसरातील श्रीराम साधना आश्रमात आयोजित पंचदिनात्मक श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याला श्री क्षेत्र देवगड गुरूदेव दत्त पीठाचे महंत राष्ट्रसंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांनी भेट देत प्रभू श्रीरामचंद्रांचे दर्शन घेतले.

यावेळी बोलताना भास्करगिरी महाराज म्हणाले, प्रभू रामचंद्र म्हणजे शक्तीचे रूप असून अयोध्येतील मंदिर हे श्रद्धा व संस्कारांचे प्रतीक आहे. पाचशे वर्षांच्या संघर्षानंतर उभारलेले राममंदिर ही आपल्या पिढीसाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. श्रीराम नामस्मरणातून सकारात्मक ऊर्जा मिळते, तर दानधर्मामुळे समाजकार्याला बळ मिळते, असा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाच्या प्रारंभी आश्रमाचे प्रमुख महंत स्वामी सुनीलगिरी महाराज यांनी स्वागत करून आश्रमातील उपक्रमांची माहिती दिली. यावेळी भागवताचार्य साध्वी सुवर्णानंद चैतन्य, बाळासाहेब शिंदे, दत्ताभाऊ कांगुणे आदींच्या हस्ते भास्करगिरी महाराजांचे संतपूजन करण्यात आले.

प्रवचन सोहळ्यास विविध संतसेवक, ग्रामस्थ व महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

# रोहित्राजवळील जाहिरातीचे फलक काढा : मुन्ना चक्रनारायण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा कॉलेज समोर वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे व विद्युत रोहित्राजवळ लावण्यात आलेले जाहिरातीचे फलक काढण्यात यावे अशी मागणी ठाकरे गट शिवसेनेचे तालुका उपाध्यक्ष मुन्ना चक्रनारायण यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या उपविभागीय अभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



मुन्ना चक्रनारायण यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की नेवासा महाविद्यालयासमोरील चक्रनारायण वसाहतीच्या जवळ आईसक्रिम दुकान चालकाने नेवासा ते नेवासाफाटा रोडवर अतिक्रमण करुन जाहिरातीचा मोठा फलक लावून वहातुकीस मोठा अडथळा निर्माण केला आहे विशेष म्हणजे नुकत्याच बसविण्यात आलेल्या विद्युत रोहित्राला जाहिरातीच्या या फलकाने विळखा घातला आहे

सदरचा रस्ता हा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत येत असून विद्युत रोहित्राजवळून चक्रनारायण वसाहतीमध्ये जाण्यासाठी अंतर्गत रस्ता तयार करण्यात आला असून सदरचा रस्ता हा नेवासा शेवगांव रोडला येवुन मिळतो. सदरच्या रस्त्याच्या कडेला सदरचे आईसक्रिम दुकानदाराने त्याच्या जाहिरातीचे बोर्ड सार्वजनिक बांधकाम खात्याच्या हद्दीत लावल्याने रोडवर येण्यासाठी अडथळा निर्माण होत असुन नेवासा शेवगांव रोडने येणाऱ्या गाड्या दिसत नाहीत. त्यामुळे मोठा अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झालेली आहे.

तसेच या भागात किरकोळ अपघात ही झालेले आहेत. जवळच ज्ञानेश्वर महाविद्यालय व लहान मुलांचे ज्ञानदिप पब्लीक स्कुल असल्याने त्याठिकाणी मोठी वर्दळ असते त्यातच सदर दुकान मालकाने रस्त्यावरच जाहिरातीचे बोर्ड लावल्याने वाहन चालक रस्त्याचे कडेने चालण्याऐवजी त्यांना मधुन चालावे लागते म्हणुन सदरचे क्षेत्र हे अतिशय अपघात प्रवन झालेले आहे. वाहतुकीस अडथळा ठरणारे सदरचे फलक काढण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाने करावी अन्यथा यासाठी परिसरातील नागरिकांना बरोबर घेऊन तीव्र आंदोलन छेडले जाईल असा ईशारा शिवसेना तालुका उपप्रमुख मुन्ना चक्रनारायण यांनी दिला आहे.

# निधीचा सदुपयोग करून रस्त्याचे काम दर्जेदार करा : सुनील गंगुले



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आ. आशुतोष काळे यांनी शहरातील विविध विकासकामे, प्रमुख रस्ते आणि पायाभूत सुविधांसाठी विकास निधी दिला असून या निधीचा सदुपयोग करून पालखी रस्त्याचे काम दर्जेदार करा असे राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी सुनील गंगुले यांनी म्हटले आहे.

कोपरगाव शहरातील प्रभाग क्रमांक १५ मधील नागरिकांसाठी आणि भाविकांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असलेल्या गोदावरी नदीवरील छोटा पूल ते बेट या पालखी रस्त्याच्या डांबरीकरण कामाला प्रत्यक्षपणे सुरुवात झाली आहे. आ. आशुतोष काळे यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे आणि त्यांच्या विशेष प्रयत्नांतून या रस्त्यासाठी ३७ लक्ष २६ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला असून या महत्त्वपूर्ण रस्त्याचे भूमिपूजन काही महिन्यांपूर्वी आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते संपन्न झाले होते. मात्र संबंधित ठेकेदाराने कामाला दिरंगाई केली असून रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाला मंगळवार दि. २४ रोजी सुरुवात झाली असून यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने श्रीफळ फोडून कामाचा शुभारंभ करण्यात आला यावेळी ते बोलत होते.

यावेळी राष्ट्रवादीचे सुनिल गंगुले, नगरसेवक मंदार पहाडे, राजेंद्र वाकचौरे, सचिन गवारे, राहुल शिरसाठ, विजय त्रिभुवन, माजी नगरसेवक फकीरमामू कुरेशी, राजेंद्र आभाळे, विजय नागरे, राहुल आव्हाड, सागर लकारे, प्रशांत मोरे, राजेंद्र खैरनार, जावेद शेख, पप्पू देशमुख, सोमा शिंदे, तेजस गंगुले, वैभव कानडे, मनोज नरोडे, सचिन परदेशी, विलास आव्हाड, निलेश पाखरे, नाजीम शेख, राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### प्रवासी कार्डच्या अडचणी तातडीने दूर करा : डॉ. जाधव

**पुणतांबा** : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून सवलतीच्या एनसीएमसी प्रवासी कार्ड वितरणाची प्रक्रिया सुरू असली तरी त्यामध्ये जेष्ठ नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्या तातडीने दूर कराव्यात, अशी मागणी आशाकेंद्र जेष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुधाकर जाधव यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाच्या प्रती ना. राधाकृष्ण विखे तसेच श्रीरामपूर व कोपरगाव आगार प्रमुखांना देण्यात आल्या आहेत. कार्ड काढण्यासाठी ग्रामीण भागातील जेष्ठ नागरिक व महिलांना तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते, त्यामुळे गावपातळीवर केंद्र सुरू करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेषतः ७५ ते ८० वयोगटातील नागरिकांचे बोटांचे ठसे व्यवस्थित न आल्याने ते सवलतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. पोस्ट विभागामार्फत ही सेवा उपलब्ध करून दिल्यास अधिक लाभ होईल, असेही त्यांनी सुचवले. यावेळी आगारप्रमुख बेहरे यांच्याशी चर्चा करण्यात आली.

### आज ५१ फुटी धर्मध्वजाचे लोकार्पण सोहळा



**सोनई** : सोनई लगत असलेल्या श्रीरामवाडी- लांडेवाडी रस्त्यावरील श्रीराम चौक येथे आज श्रीराम नवमीचे अवचित साधून ५१ फुटी धर्म ध्वजाचे लोकार्पण सोहळ्याचे उद्घाटन माजी मंत्री शंकररावजी गडाख यांच्या प्रमुख हस्ते सोळा संपन्न होणार आहे. त्यानिमित्ताने प्रमुख उपस्थिती म्हणून बालब्रह्मचारी हभप सद्गुरु पंढरीनाथ महाराज तांदळे हे राहणार आहे. या सोहळ्यासाठी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सुनील गडाख युवा नेते उदयन गडाख आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. तरी सोनई व पंचक्रोशीतील सर्व राम भक्तांनी या सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन श्रीराम भक्त डॉ. ज्ञानेश्वर दरंदले यांनी केली आहे.

### हरेगाव फाट्यावरील पेट्रोल पंपावर तोबा गर्दी



**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव हद्दीतील अशोक सहकारी साखर कारखाना पेट्रोल पंप या ठिकाणी पंचक्रोशीतील नागरिकांनी पेट्रोल भरण्यासाठी मोठी गर्दी केली. यावेळी पेट्रोल पंप व्यवस्थापन यांची मोठी तारांबळ झाली. येथील कर्मचाऱ्यांनी लाईनमध्ये सर्वांना पेट्रोल देण्याचे आवाहन केले. तरी पंचक्रोशीतील नागरिकांनी सहकार्य करावे असे पेट्रोल पंप व्यवस्थापन समिती यांनी आवाहन केले.

### पिंप्री लौकी-अजमपूर येथे शेतीपंपाचा वीजपुरवठा विस्कळीत; आंदोलनाचा इशारा

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील पूर्व भागातील पिंप्री लौकी-अजमपूर परिसरात शेतीपंपाचा वीजपुरवठा गेल्या चार ते पाच महिन्यांपासून अत्यंत विस्कळीत होत असल्याने शेतकरी हैराण झाले आहेत. कमी दाबाने व वारंवार खंडित होणाऱ्या वीजेमुळे पिकांना पाणी देणे कठीण झाले असून मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. सामाजिक कार्यकर्ते भारतराव पाटील गीते यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, दररोज सात तास वीज देण्याचे नियोजन असतानाही प्रत्यक्षात दोन ते तीन तास वारंवार खंड पडत आहे. कमी दाबामुळे विद्युत पंप व इतर उपकरणे जळून नुकसान होत असून अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.दरम्यान, रात्रीच्या वीजपुरवठ्यामुळे बिबट्याच्या दहशतीत शेतात जाणे धोकादायक ठरत आहे. दिवसाही अखंडित वीज न मिळाल्याने पिकांना वेळेवर पाणी देता येत नाही. त्यामुळे शेतकरी वर्ग संतप्त झाला असून तातडीने वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. या संदर्भात लवकरच एक शिष्टमंडळ जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन निवेदन देणार असल्याचे गीते यांनी सांगितले.

### तहसील कार्यालयात दिव्यांगांसाठी लिफ्ट मंजूर

**शिरसगाव** : श्रीरामपूर येथील नवीन प्रांत/तहसील कार्यालय, संजय गांधी निराधार योजना व पुरवठा विभागाच्या इमारतीत दिव्यांगांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या पार्श्वभूमीवर लिफ्ट मंजुरीचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी मे महिन्यात शासनामार्फत लिफ्ट मंजूर केली जाईल, अशी ग्वाही दिली. जिल्हा व्यवस्थापन समितीचे सदस्य संजय साळवे यांनी ही बाब जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, अहिल्यानगर जिल्हा मूकबधिर असोसिएशन, अपंग सामाजिक विकास संस्था श्रीरामपूर व आसान दिव्यांग संघटना महाराष्ट्र यांच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. निवेदनात संशयास्पद दिव्यांग प्रमाणपत्रांची चौकशी, स्थानिक स्वराज्य संस्थांकडील पाच टक्के निधी तातडीने वितरित करणे, जीएसटी बिलाची सक्ती टाळणे, नोकरीतील आरक्षण कोटा भरणे, तसेच दिव्यांगांना वाहन परवाना व रोजगारासाठी माहिती देण्याच्या मागण्या करण्यात आल्या.

# कांदा उत्पादकांसाठी ठोस धोरण निश्चित करा : आ. आशुतोष काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कोळपेवाडी** : राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक संकटात सापडला असल्याने कांदा प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी बुधवार (दि. २५) रोजी मंत्रालय, मुंबई येथे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक संपन्न झाली. या बैठकीत आ. आशुतोष यांनी मुख्यमंत्र्यांकडे कांदा प्रश्नावर ठोस धोरण निश्चित करण्याची मागणी केली. राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या नैसर्गिक आपत्ती आणि बाजारपेठेतील अनिश्चित दर अशा दुहेरी संकटात सापडले आहेते.

कांद्याच्या दरात झालेली घसरण कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी चिंतेची बाब बनली असून सद्यस्थितीत कांद्याला मिळणारा भाव पाहता शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे अशक्य झाले आहे. शेतकऱ्यांच्या पदरात किमान दोन पैसे पडावेत आणि शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी सरकारने कांदा प्रश्नावर योग्य निर्णय घेणे गरजेचे असल्याने कांदा उत्पादक पट्ट्यातील विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करून बाजारभावातील चढ-उतार आणि निर्यात धोरण यांमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजनांबाबत शासनाने ठोस धोरण निश्चित करण्याची मागणी आ. आशुतोष काळे यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे या बैठकीत केली आहे.

या महत्त्वपूर्ण बैठकीसाठी अन्न व नागरी पुरवठामंत्री ना.छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदामंत्री ना. गिरीशजी महाजन, कृषीमंत्री ना. दत्तात्रय भरणे, शालेय शिक्षण मंत्री ना. दादा भुसे, अन्न व औषध प्रशासनमंत्री ना. नरहरी झिरवळ, पणन व राजशिष्टाचार मंत्री ना. जयकुमार रावल तसेच इतरही मतदारसंघांचे विधानसभा सदस्य आणि प्रशासकीय वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## सहकारी संस्थांतील भ्रष्टाचाराची सीआयडी चौकशी करा : निलेश शेडगे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : साखर कारखाने, सूतगिरण्या, दूध संघ, बाजार समित्या व सोसायट्या अशा शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप करत संबंधित पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या संपत्तीची सीआयडी किंवा ईडीमार्फत चौकशी करावी, अशी मागणी शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्षाचे जिल्हाध्यक्ष निलेश शेडगे यांनी केली आहे. प्रसिद्धीपत्रकात शेडगे यांनी म्हटले आहे की, सहकारी संस्थांच्या दूरवस्थेला भ्रष्टाचार करून स्वतः मालामाल झालेल्या पदाधिकाऱ्यांचा मोठा वाटा आहे.

कालपर्यंत साधे जीवन जगणारे काही जण अचानक बंगले, महागड्या गाड्या, हॉटेल, पेट्रोल पंप, फार्महाऊस व शेकडो एकर जमीन कशी काय मिळवतात? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. शेतकऱ्यांच्या पैशावर राजकारण करत निवडणुकांमध्ये पैशांचा मोठ्या प्रमाणावर वापर करून मतदारांची खरेदी केली जाते, असा आरोपही त्यांनी केला. संस्था दिवाळखोरीत गेल्यानंतर मात्र शासनाकडे मदतीसाठी धाव घेतली जाते, ही बाब शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच, या प्रकरणांमध्ये संबंधित कार्यकारी संचालक, सचिव व अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय भ्रष्टाचार शक्य नसल्याचे सांगत त्यांच्या संपत्तीचीही चौकशी करण्याची मागणी शेडगे यांनी केली आहे.

# राहुरीत सर्वसामान्यांमधून नेतृत्वाची गरज

## तिसरा सक्षम पर्याय देणार : राजूभाऊ शेटे पाटील

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : आजपर्यंत आपण इतरांना आमदार करण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतले. मात्र, निवडणुका जिंकल्यानंतर प्रस्थापित राजकारणी सर्वसामान्यांचे प्रश्न विसरून स्वतःचे हित जोपासण्यात धन्यता मानतात. गेल्या काही निवडणुकांचा अनुभव पाहता, आता राहुरी मतदारसंघात सर्वसामान्य कुटुंबातील नेतृत्व निर्माण होण्याची गरज आहे. जनतेच्या आणि शिवसैनिकांच्या आग्रहाखातर तिसरा सक्षम पर्याय देण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने निश्चित विचार केला जाईल, असे स्पष्ट प्रतिपादन शिवसेना नेते राजूभाऊ शेटे पाटील यांनी केले. याप्रसंगी शिवसेना प्रणित शेतकरी सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष रवींद्र मोरे यांनी आपली भूमिका मांडताना म्हटले की, या निवडणुकीत शिवसैनिक घेतील तीच 'पूर्व दिशा' ठरणार आहे.

प्रस्थापित राजकारण्यांमुळे राहुरी मतदारसंघाची 'विकासगंगा' थांबली असून, सामान्य शेतकरी व नागरिक उपेक्षित आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातूनच या मतदारसंघाचा कायापालट होऊ शकतो. त्यामुळे शिवसैनिकांनी आतापासूनच गावागावात कामाला लागावे. मंगळवार दि. २४ रोजी राहुरी येथे शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत राहुरी विधानसभा पोटनिवडणूक पूर्ण ताकदीने लढविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.ह.भ.प. संपत महाराज जाधव (जिल्हाप्रमुख, आध्यात्मिक आघाडी): उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात शिवसेनेची मोठी ताकद निर्माण झाली आहे. सामान्य कुटुंबातील उमेदवारच या विधानसभेचा विकास करू शकतो.

राहुरी कारखाना निवडणुकीत जनतेने राजूभाऊ शेटे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे. आता विधानसभेवर भगवा फडकवण्यासाठी तरुण वर्ग सज्ज असल्याची ॲड भाऊसाहेब पवार यांनी सांगितले . ही निवडणूक हातात घेतल्यास आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची तयारी देखील पूर्ण होणार असल्याचे धीरज पान संबळ यांनी सांगितले. यावेळी राहुरी विधानसभा मतदार संघातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन निवेदक महेंद्र उगले यांनी केले तर आभार युवा सेना ता. प्रमुख सचिन करपे यांनी मानले.

**संजीव भोर पा. व बाबुशेठ टायरवाले यांच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांकडे साकडे**

राहुरी विधानसभा लढविण्याबाबतची शिवसैनिकांची ही भावना शिवसेना राज्य प्रवक्ते तथा सहसंपर्क प्रमुख संजीव भोर व शिवसेना नगर दक्षिण जिल्हाध्यक्ष बाबुशेठ टायरवाले यांच्या माध्यमातून मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत पोहोचवण्यात येईल. पक्षादेशाप्रमाणे पुढील रणनीती ठरवली जाईल, अशी माहिती शिवसेना राहुरी तालुका प्रमुख देवेंद्र लांबे यांनी दिली.

# वकिलांच्या सुरक्षेसाठी कायदा कधी?

## आ. सत्यजीत तांबे यांचा सरकारला सवाल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**मुंबई** : राज्यातील वकिलांवर वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, आमदार सत्यजीत तांबे यांनी सभागृहात हा मुद्दा जोरदारपणे उपस्थित करत सरकारला थेट जाब विचारला. वकील संरक्षणासाठी स्वतंत्र कायदा कधी होणार, असा सवाल त्यांनी केला. यावेळी बोलताना तांबे म्हणाले की, वकिलांवरील हल्ले ही गंभीर बाब असून यामुळे कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. न्यायासाठी लढणाऱ्यांवरच हल्ले होत असतील, तर सामान्य नागरिकांना न्याय कसा मिळणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

वकिलांचे संरक्षण हे न्यायप्रक्रियेच्या विश्वासार्हतेशी थेट संबंधित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्य सरकारने यापूर्वी केंद्र सरकारकडून कायदा होण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले होते. मात्र, इतर राज्यांनी स्वतंत्र कायदे केले असताना महाराष्ट्राने केवळ केंद्राची वाट पाहणे योग्य नसल्याचे मत तांबे यांनी मांडले. तातडीने ठोस उपाययोजना करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. उत्तर देताना राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सकारात्मक प्रतिसाद देत केंद्र सरकारशी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले. लवकरच याबाबत निर्णय अपेक्षित असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, तांबे यांनी यापूर्वी विविध अधिवेशनांत हा मुद्दा उपस्थित केला असून, आवश्यक असल्यास राज्याने स्वतंत्र कायदा करण्याचा विचार करावा, असेही त्यांनी सूचित केले.

# कॉँग्रेसचे नेते शरद थोरात व अक्षय भालेराव यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : संगमनेर पंचायत समिती सीआरपी कार्यालयातील अधिकारी नंदलाल कोकाटे यांना मारहाण केल्याप्रकरणी काँग्रेस पक्षाचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात बंधू शरद थोरात व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे माजी शहराध्यक्ष अक्षय भालेराव या दोन जणांना न्यायालयाने २७ मार्चपर्यंत म्हणजे ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. संगमनेर तालुक्यातील शेडगाव येथील एका महिला बचत गटातील समुदाय संसाधन व्यक्ती (सीआरपी) यांना गेल्या दहा महिन्यांपासून मानधन मिळाले नसल्याने संबंधित महिलेचा पती वरचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचे चुलत बंधू शरद थोरात हे पंचायत समिती च्या सीआरपी कार्यालयात महिलेचे मानधन का रोखले आहे याचा जाब विचारण्यासाठी गेले होते. यावेळी पंचायत समितीचे तालुका अभियान व्यवस्थापक नंदलाल कोकाटे यांनी त्या महिलेचे काम समाधान कारक नसल्यामुळे गटविकास अधिकार्यांनी मानधन रोखल्याचे सांगितल्याने वाद निर्माण झाला.या वादातून संतापलेले शरद थोरात यांनी कोकाटे यांना मारहाण केली या घटनेची माहिती मिळताच अभिषेक थोरात, ऋषिकेश थोरात, अक्षय भालेराव व इतर काही जणांनीही कोकाटे यांना त्यांच्या कार्यालयात घुसून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या घटनेत कोकाटे जखमी झाले. त्यांच्यावर लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी तालुका समन्वय व्यवस्थापक नंदलाल कोकाटे यांनी संगमनेर शहर पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून काँग्रेस नेते शरद थोरात यांच्यासह त्यांचा मुलगा अभिषेक थोरात, पुतण्या ऋषिकेश थोरात, अक्षय भालेराव, शिवामृत भोकरे तसेच इतर आठ ते दहा जणांविरोधात शासकीय कामात अडथळा आणणे व इतर गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कोल्हार - लोणी रस्त्याची दुरवस्था

### खड्ड्यात रस्ता की रस्त्यावर खड्डे छोट्या मोठ्या अपघाताचे प्रमाण वाढले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कोल्हार** : कोल्हार -३ लोणी रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडल्यामुळे कोल्हार- लोणी रस्ता सध्या वाहन चालकांसाठी अतिशय त्रासदायक ठरत आहे. या रस्त्यावरून सकाळी प्रवरानगर व लोणी या ठिकाणी कामावर जाणाऱ्या कामगारांना तसेच विध्यार्थ्यांना व वाहन चालकांना हा रस्ता अतिशय धोकेदायक बनला असून या रस्त्यावरील खड्ड्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून या रस्ता दुरुस्तीचे काम त्वरित व्हावे अशी मागणी वाहन चालक व विध्यार्थी, नागरिक करीत आहेत या लोणी रस्त्यावर सध्या पुलांचे काम सुरू असून हे काम अतिशय धिम्या गतीने सुरू आहे.

त्या ठिकाणी वाहतूक तात्पुरत्या स्वरूपात पुलाच्या जवळून केलेल्या रस्त्यावरून सुरू आहे हा रस्ता रात्रीच्या वेळेस या ठिकाणी कोणतेही सूचनाफलक नसल्यामुळे लक्षात येत नाही. प्रवरानगर ते लोणी पर्यंतचा गुळगुळीत असलेला रस्ता अक्षरशः नांगरून ठेवल्यामुळे या रस्त्याला कच्च्या रस्त्याचे स्वरूप आले असून वाहनांची सारखी वर्दळ असते तसेच प्रवरानगर कारखाना व लोणी या ठिकाणी सकाळी कामावर जाणाऱ्या कामगारांची ये-जा सुरू असते कामावर वेळेत हजर राहून आपले पंचिंग होऊन आपली हजेरी लागावी व अधिकारांच्या बोलण्याला सामोरे जाऊ नये म्हणून अनेक कामगार सकाळी मोटर सायकल वरून याच खड्डेमय व धोकादायक रस्त्यावरून प्रवास करीत कामाच्या ठिकाणी पोहोचतात तसेच जड वाहतूक करणारे वाहने देखील खड्डे चुकवीत नागमोडी वळण घेत याच रस्त्यावरून मार्गक्रमण करताना दिसत असल्यामुळे अलीकडच्या काळात या रस्त्यावर अनेक छोटे मोठे अपघात होऊन या प्रवासी जखमी झाले आहेत.

नेहमीच गुळगुळीत व विना खड्ड्याचा असलेला हा रस्ता गेले दोन ते तीन महिन्यापासून खड्डेमय अवस्थेत असल्यामुळे या रस्त्याची खूपच दुरावस्था झाली आहे तशातच एका कार्यक्रमाच्या निमित्ताने या रस्त्यावरील वेग नियंत्रण करणारे गतिरोधक देखील काढून टाकण्यात आले असल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याचे या रस्त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. या रस्ता दुरुस्तीचे काम लवकर हाती घेऊन हा रस्ता पूर्वीसारखाच गुळगुळीत व्हावा व वाहन चालकांना या रस्त्यावरून सुरक्षित प्रवास करता यावा अशी अपेक्षा नागरिक व वाहन चालक करीत आहेत.

# दिलबादशहा बाबा यात्रा उत्सवाची जंगी आखाड्याने सांगता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द येथील हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतिक असलेले ग्रामदैवत दिलबादशाह बाबा यात्रा उत्सवानिमित्त आयोजित केलेल्या जंगी (आखाडा) हगाम्यात शेवटची कुस्ती मानकरी पहिलवान भरत चव्हाण हा ठरला. त्याला रोख स्वरूपात ५१ हजार रुपय रोख पारितोषिक देऊन गौरवण्यात आले तर चितपट कुस्तीचा मानकरी म्हणून मांडवे खुर्द येथील नामांकित मल्ल पै. प्रशांत किसन जाधव यांनी मिळवला. काही क्षणातच कुस्ती चितपट केल्याने तरुण मित्र मंडळ ग्रामस्थ यांच्यावतीने रुपये १७ हजार रोख स्वरूपात देऊन गौरविण्यात आले यात्रा कमिटी ग्रामस्थ तरुण मित्र मंडळ यांच्या वतीने मानाच्या कुस्तीचा किताब बहाल केला दिल बादशहा बाबा मित्रमंडळाने त्याचे विशेष कौतुक केले. मंगळवार दि. २४ मार्च रोजी दुपारी मांडवे खुर्द येथे जंगी हंगामा भरवण्यात आला होता. यावेळी जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील नामांकित पहिलवानानी सहभाग घेतला होता.

गावातील ज्येष्ठ नागरिक माजी सोसायटी चेअरमन रावसाहेब पाटील गागरे यांच्या हस्ते नारळ वाढवून जंगी हंगामाची सुरुवात करण्यात आली. जिल्हाभरातून सहभाग घेतलेल्या अनेक मल्लांनी नेत्रदीप मैदान गाजवले. सदर मैदानावर यात्रा कमिटीने योग्य प्रकारचे नियोजन केले होते. सोमवारी छबिना मिरवणूक, रात्री तमाशा आणि मंगळवारी सकाळी पारंपारिक असा भेदिक भजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यानंतर दुपारी जंगी कुस्तीचा हंगामा दोन दिवस यात्रेचे स्वरूप असल्याने परिसर दुमदुमून गेला होता. सदर यात्रा उत्सव मोठ्या उत्सहात व शांततेत संपन्न झाला. यावेळी पारनेर ग्रामीण पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष व तसेच पारनेरचे विद्यमान आमदार काशिनाथ दाते यांचे चिरंजीव डॉ. प्रदीप दाते, आदिकराव खेमनर, नांदूरचे सरपंच राजेंद्र राजदेव, ज्येष्ठ मार्गदर्शक रावसाहेब गागरे का. पो. श्रीरंग गागरे, मेजर जगन्नाथ जाधव, शिवाजी जाधव, नंदकुमार गागरे, राहुल सुंदर जाधव, संतोष जाधव, देवराम शिवनाथ जाधव, भाऊसाहेब गागरे, दिनकर जाधव, सुनील गागरे, पांडुरंग जाधव, डॉ. रामदास गागरे, जगदीश गागरे, बाळासाहेब जाधव, पत्रकार राजेंद्र गागरे यांसह यात्रा कमिटी ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले आखाड्यात पंच म्हणून पैलवान संतोष जाधव पै पोपट गागरे पै किसन जाधव पै संजय पवार भास्करराव औटी आदींनी काम पाहिले तर कुस्ती निवेदक म्हणून अक्षय मुळूक यांनी काम पाहिले तर तर आखाडा मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ पैलवान तानाजी नरके (राजुर) यांनी काम पाहिले तर यात्रा कमिटी ग्रामस्थ व तरुण मित्र मंडळ यांच्या वतीने आलेल्या सर्व मान्यवरांचे आभार मानले.

तहसिल कार्यालय कोपरगांव
क. कावि/फौजदारी/हस्ते/२०२६
कोपरगांव दि.०१.२०२०

**जाहीर नोटीस**

कोपरगांव येथील में. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात.

रुविक्षा एजाज शेख /सबिहा सिंकदर शान
रा. कोल्हार बु ता. राहाता
**अर्जदार**
विरुध्द सामनेवाले
निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. कोपरगांव ता. कोपरगांव, जि. अहिल्या नगर......
**सामनेवाले**

ज्याअर्थी, अर्जदार सविहा एजाज शेख रा. कोपरगांव यांनी जन्म मृत्यु नौदणी अधिनियम १९६९ में कलम १३(३) अन्वगे अर्जदार यांचा दिनांक. ०१.०७.१९८५ रोजी मौजे, कोपरगांव ता. कोपरगांव येथे जन्म झाल्या आहे. अर्जदार यांचे जन्माची नोद मुख्याधिकारी न.प. कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर पोचेकडे अनावधानाने करावयाची राहुन गेली आहे, तथापी अर्जदार पांची जन्माची नोंद जना मृत्यु रजिष्टरला नौद होण्याकामी तसा में कोर्टचा आदेश होण्याकामी चौकरी अर्ज पा से, कोर्टात दारात केलेला आहे

तरी अर्जदार पांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९५९ में कलम १३(३) अन्वये, अर्जदार यांचे दिनांक ०१.०७.१९८५ रोजी मौजे, कोपरगांव ता.कोपरगांव येथे जन्म झाला आहे. सविष्ठा सिंकदर खान पचि जन्माची नोंद मुख्याधिकारी न.प. कोपरगाव ता.कोपरगांव जि. अहिल्यानगर, येथे होण्याबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिष्य झाल्यापासुन १५ दिवसांचे आत मौग्य स्पा कागदपत्री पुराव्यांसठ सदस्यी हरकत में, कोर्टसमोर हजर होवून पुराव्यानिशी दाखल करावी, अन्यथा सदर मुदतीत कौणामीही कोणतीही हरकत न आलास सदर जभाची नौद करण्यास कोणाबीही हरकत नाही असे समजुन में. न्यायालय पुढील योग्य ती आदेश पारीत करेल, तदनंतर कोणाचीठी कोणतीही कार चालनार नाही, याची आज

जाहीर नौव मा जाहीर नाम्याने घेण्यात यावी, कळावे. दि. ०१.२०२६ रोजी माइया सही व व्यापारापाच्या शिक्क्यानीशी दिलेते.

शिक्का

**हुकूमावरुन**
**तहसिलदार कोपरगांव**

**जाहीर नोटीस**

निशाणी नं. ६
नेमलेली ता. २७.०४.२०२६
ॲड. ओ. जी. मोटे

नेवासा येथील में. सह दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर यांचे कोर्टात
वारस चौकशी अर्ज नं. ४४/२०२६

**अर्जदार** - १. निखील नितीन मोटे वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा.वडाळा बहिरोबा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर
२. निकीता प्रतिक देशमुख वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, मार्बल बाऊण्डी, माळेवाडी रोड, हडपसर, पुणे
३. पुष्पा नारायण मोरे वय ६१ वर्ष, धंदा घरकाम, रा. सावेडी गाव, अहिल्यानगर
४. पुष्पलता नितीन मोटे वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडाळा बहिरोबा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

**सामनेवाला** - कोणीही नाही (मयत नामे भाऊसाहेब मुरलीधर मोटे मयत दि. २६.१२.२०२५)

वरील अर्जदार यांनी न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता वारस चौकशी अर्ज नं. ४४/२०२६ दाखल केलेला आहे. अर्जदार नं. १ हे मयत भाऊसाहेब मुरलीधर मोटे यांचा नातु असुन अर्जदार नं. २ ही नात आहे तसेच अर्जदार नं. ३ ही मयताची मुलगी आहे. तसेच अर्जदार नं. ४ ही मयताची सुन आहे. अर्जदार नं. १ व २ यांचे वडिल व अर्जदार नं. ३ यांचे भाऊ तसेच अर्जदार नं. ४ यांचा पती नामे नितीन भाऊसाहेब मोटे हे दि. १९.०५.२००८ रोजी मयत झालेले आहे. तर मयत भाऊसाहेब मुरलीधर मोटे यांची पत्नी नामे लताबाई भाऊसाहेब मोटे हया दि. २६.०५.२००२ रोजी मयत झालेल्या आहे. त्यांचे वर नमूद अर्जदार हेच वारस आहे. त्याचे व्यक्तीरिक्त मयतास कोणीही वारस नाही. मयत भाऊसाहेब मुरलीधर मोटे यांचे नावावर मौजे वडाळा बहिरोबा ता. नेवासा येथील ग्रामपंचायत मिळकत नंबर ११४२ क्षेत्र १२ बाय २० पत्र्याची खोली आहे व सदर मिळकतीवर त्यांचा अनुज्ञाप्ती नं. CL III 84 BR II (कंट्री लिकर व बिअर) हा परवाना होता व आहे. तसेच मयत भाऊसाहेब मोटे यांचे नावे ए.डी.सी.सी. बँक अहमदनगर शाखा वडाळा बहिरोबा येथील स्टिलेज मेडीयम लॉकर नं. ३७ आहे. सदर अनुज्ञप्तीस, ग्रामपंचायत जागेस व संबंधीत बँकेत अर्जदार यांचे शिवाय इतर कोणीही वारस नसुन अर्जदार हेच वारस असल्यामुळे तसे वारसप्रमाणे मिळणेकामी या न्यायालयात सदरचा वारस चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जदार हे सदर मयताचे वारस नाही अगर वारस नोंदी बाबत तक्रारी, हरकती असे कोणाचे काही म्हणने असल्यास तसेच सदर अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन एक महिन्याच्या आत किंवा दि.२७.०४.२०२६ पर्यंत स्वतः किंवा वकिला मार्फत हजर होवून हरकती दाखल कराव्यात. सदर वारस चौकशी अर्जावर हरकती प्राप्त न झाल्यास वारसाबाबत काही एक म्हणने नाही असे समजून में. कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेऊन मयत भाऊसाहेब मुरलीधर मोटे यांचे अर्जदार हेच वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराचे लाभात देण्याचे आदेश करतील.

आज दि. २४.०३.२०२६ रोजी माझी सही निशाणी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले असे. पुढील नेमलेली तारीख २७.०४.२०२६

**तयार करणार**
**व लिपीक**

शिक्का

**आदेशावरुन**
**सह अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर नेवासा**

## पान १ वरुन

## हवामान बदलामुळे महाराष्ट्रातील कुपोषणाच्या समस्येत वाढ

गर्भधारणेच्या पहिल्या १,००० दिवसांमध्ये हे अत्यंत वेगाने विकसित होतात. या टप्प्यात पोषण कमी पडल्यास भविष्यात लठ्ठपणा आणि टाईप-२ मधुमेहासारखे आजार बळावतात. गर्भधारणेदरम्यान मातृ पोषणाची काळजी घेणामरे आणि पर्यावरणीय ताण कमी करणारे उपाय हे कुपोषण आणि असुरक्षिततेच्या पिढ्यानपिढ्या चालणाजया चक्राला तोडण्यासाठी सर्वात फायदेशीर मार्गांपैकी एक आहे, असे युनिसेफ महाराष्ट्राचे प्रमुख संजय सिंह यांनी सांगितले. पत्र सूचना कार्यालयाच्या (पश्चिम विभाग) महासंचालिका स्मिता वत्स-शर्मा यांनी शासनाची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, आजची कार्यशाळा या पुराव्यांना कृतीत रूपांतरित करण्याच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. देशातील प्रत्येक गर्भवती महिलेला, विशेषत: आदिवासी आणि ग्रामीण समुदायांमध्ये, आवश्यक पोषण व निगा मिळवून देण्यासाठी भारत सरकार कटिबद्ध आहे.

## अखेर शिर्डीत खरात विरोधात बलात्काराचा गुन्हा

मार्गदर्शन करताना त्या जमिनीत बंगला बांधू नको ती जागा शापित आहे असे बनव केला व तिचा विश्वास संपादन करून तिला ओशनो जल हे गुंगीचे औषध देऊन तिच्यावर चार वेळा बलात्कार केला असल्याची फिर्याद त्या पिडीत तरुणीने सरकार वाडा पोलीस ठाणे नाशिक यांचेकडे नोंदवली आहे .त्याआधी तिने दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी खरात याचा ऑफिस बॉय नीरज जाधव याचे विरोधात तीचे व खरातचे अश्लील व्हिडिओ व्हाट्सअप मेसेज वर पाठवून पाच कोटी रुपये दे अन्यथा तुझे आणि बाबाचे फोटो व्हायरल करू अशी धमकी दिली होती . यावरून शिर्डी पोलिसांनी नीरज जाधव याचे विरोधात शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. पीडित तरुणीने तपासाकामी तिचा मोबाईल नंबर शिर्डी पोलिसांना दिला नाही तसेच तिला कोणत्या मोबाईल नंबर वरून निरज ने मेसेज पाठवले तोही नंबर तिला सांगता आला नाही. या गुन्हाचा तपास करताना शिर्डी पोलिसांनी नीरज जाधव यास तपास कामी ताब्यात घेतल्यानंतर खरात बाबाच्या संपर्कात असणारा योगेश भालेराव हा देखील शिर्डी पोलीस ठाण्यात हजर झाला होता. त्या दरम्यान योगेश भालेराव याने अशोक खरातने आठ महिलां बरोबरील ३५ अश्लील व्हिडिओ शिर्डी पोलिसांच्या निदर्शनास आणून दिले होते. परंतु ते व्हिडिओ तो पोलिसांना देण्यास तयार नव्हता कारण त्याने सांगितले की जर मी हे व्हिडिओ आपणास दिले तर खरात हा मला जिवंत ठेवणार नाही. शिर्डी पोलिसांनी त्यास विश्वासात घेऊन त्याच्या सुरक्षिततेची हमी देत त्याच्याकडून ते व्हिडिओ जप्त केले होते.

## अशोक खरातच्या प्रॉपर्टीत गुंतवणूक

आहे. या प्रकरणात संबंधित सर्वांची चौकशी करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं. तसेच या प्रकरणात कुणालाही सोडणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला. त्यानंतर आता प्रशासकीय अधिकारी अडचणीत आले आहेत.अभिजीत भांडे पाटील हे उपजिल्हाधिकारी पदावर कार्यरत असून त्यांचे अशोक खरातशी असलेले संबंध समोर आले आहेत. अशोक खरातच्या मुलीच्या आणि पत्नीच्या नावे असलेल्या जमिनीमध्ये गुंतवणूक केल्याप्रकरणी आता त्यांची अडचण वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशोक खरातशी संबंधित अनेक कामांमध्ये अभिजीत भांडे पाटील यांची गुंतवणूक असल्याचा आरोप केला जात आहे. आता त्यांच्यावर करण्यात आलेल्या कारवाईनंतर खरातशी संबंधित इतर महसूल अधिकाऱ्यांचे धाबे दणाणल्याची चर्चा आहे.याआधी अशोक खरात प्रकरणाशी संबंध आल्यानंतर राष्टवादीच्या नेत्या रुपाली चाकणकरांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. रुपाली चाकणकर या अशोक खरातच्या संबंधित एका ट्रस्टच्या संचालिका होत्या. त्यामुळे या प्रकरणात आता त्यांची चौकशीही केली जाणार आहे.

## गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी नवे प्राधिकरण स्थापन करणार : मंत्री ॲड. आशिष शेलार

नागरिकांच्या दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. सध्या ही तलवार नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयात ठेवण्यात आली असून पुढे मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयातही प्रदर्शित केली जाणार आहे, असे त्यांनी सांगितले. सार्वजनिक गणेशोत्सवाला जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू असून, तो युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीत समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी केंद्र सरकारच्या सहकार्याने प्रस्ताव सादर केला जाणार असल्याचे मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले. राज्यातील किल्ल्यांच्या संवर्धनाबाबत बोलताना मंत्री शेलार म्हणाले, केंद्र सरकारच्या अखत्यारीत ५४ किल्ले, तर राज्य सरकारकडे ६२ किल्ले संरक्षित आहेत. याशिवाय अनेक असंरक्षित किल्ल्यांची जिल्हानिहाय नोंदणी करण्याचे काम सुरू असून वनविभागातील २५ किल्ल्यांची नोंद पूर्ण झाली आहे. असंरक्षित किल्ल्यांच्या संवर्धनासाठी 'फोर्ट कंझर्वेशन प्राधिकरण' स्थापन करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली असून, या संदर्भात सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल. या माध्यमातून खासगी गुंतवणूक, सीएसआर आणि 'महावारसा'सारख्या उपक्रमांतून निधी उभारण्यावर भर दिला जाईल. सदस्यांनी मांडलेल्या स्थानिक प्रश्नांवरही त्यांनी उत्तर दिले. जोगेश्वरी लेण्यांच्या विकासासाठी लवकरच बैठक घेण्यात येणार असून धर्मवीर गड व राजगुरू वाड्यासारख्या ऐतिहासिक स्थळांच्या संवर्धनासाठी आवश्यक कारवाई गतीने केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

सदस्यांनी दिलेल्या सर्व सूचनांचा सकारात्मक विचार करून सांस्कृतिक वारसा जतन आणि संवर्धनासाठी ठोस पावले उचलली जातील, असे आश्वासन मंत्री ॲड. शेलार यांनी दिले.

# अशोक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे स्नेहसंमेलन जल्लोषात




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : अशोक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे आयोजित अशोक पॉलिटेक्निक, डिग्री इंजिनिअरिंग, फार्मसी व आयटीआय यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. शिस्तबद्ध वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह पालक व मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार भानुदास मुरकुटे होते. प्रमुख अतिथी म्हणून आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन गुजर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी रंगत वाढवली. विशेष आकर्षण म्हणून प्रसिद्ध नृत्यांगना व अभिनेत्री सायली पाटील हिने आपल्या दमदार नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. 'स्टुडंट ऑफ द इयर' म्हणून सिद्धी तऱ्हाळ (पॉलिटेक्निक) व प्रणिता कुऱ्हे (फार्मसी) यांचा गौरव करण्यात आला, तर स्पोर्ट्स चॅम्पियनशिप मेकॅनिकल विभागाने पटकावली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंजुश्री मुरकुटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अरुण कडू व दत्तात्रय झुराळे यांनी केले. आयोजनासाठी प्राचार्य व समन्वयकांनी विशेष परिश्रम घेतले.

## माहितीअभावी सामाजिक न्याय संकल्पनेला धक्का : अण्णा हजारे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांविषयी माहितीचा अभाव असल्यामुळे सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला बाधा येत असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केले. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे माध्यम तज्ज्ञ प्रा. डॉ. विजयकुमार पोटे लिखित खपषेऑरींळेप रपव डेलळरश्र गींीळलश – ढहश ठेश्रश `ष चरीी चशवळर, उरींश झीूलहेश्रेसू रपव ठीअॅरश्र उहरपसळपस या ग्रंथाच्या प्रकाशन वेळी ते बोलत होते. अण्णा हजारे यांनी यावेळी सांगितले की, भौतिक प्रगती होत असली तरी वैचारिक, मानसिक आणि भावनिक समृद्धीचा अभाव दिसून येतो. सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा पाया मजबूत करण्यासाठी जागरूकता आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रा. डॉ. विजयकुमार पोटे यांनी आपल्या भाषणात भारतीय समाजव्यवस्था अजूनही जातीय मानसिकतेत अडकलेली असल्याचे सांगितले. राज्यघटनेने स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्यायाची हमी दिली असली तरी माहितीअभावी सामाजिक व आर्थिक विषमता वाढत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.या कार्यक्रमास सुनीता पोटे, प्रबुद्ध पोटे, दत्ता आव्हारी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांनी ग्रंथ प्रकाशनाचा उत्सव साजरा केला.

## मंडलाधिकारी सरिता मुंडे यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील भानसहिवरा मंडलात शासनाच्या विविध योजना व उपक्रम उत्कृष्टपणे राबवून या योजनांचा लाभ गोरगरीब व उपेक्षित वंचित घटकांना मिळवून दिल्याबद्दल मंडलाधिकारी सरिता मुंडे यांचा उत्कृष्ठ कामागिरीबद्दल नेवासा तालुका लोकसेवक सरपंच संघटनेच्या वतीने उत्कृष्ठ अधिकारी म्हणून विशेष सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला



नेवासाफाटा येथे झालेल्या गौरव सोहळ्यात आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या हस्ते मंडलाधिकारी सरिता मुंडे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी, तहसीलदार डॉ. संजय बिरादार प्रमुख उपस्थित होते.

तालुका लोकसेवक सरपंच संघटनेचे अध्यक्ष शरदराव आरगडे यांनी यावेळी प्रास्ताविक करतांना भानसहिवरे मंडळात मंडलाधिकारी सरिता मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सर्व शासकीय योजना व उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. त्यामुळे उपक्रम व योजनांचा सर्वसामान्य लाभार्थ्यांना लाभ मिळत असल्याने उत्कृष्ट कार्याबद्दल कर्तव्यदक्ष मंडळअधिकारी म्हणून सरिता मुंडे यांचा सरपंच संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला आहे.

यावेळी सरपंच संघटनेचे उपाध्यक्ष प्रमोद गजभार, मुकिंदपूरचे सरपंच सतीश निपुंगे, भानसहिवरेचे सरपंच किशोर जोजार, सरपंच भिवाजी आघाव, माजी अध्यक्ष दिनकरराव गर्जे, निवृत्ती काळे, गोरखनाथ कोतकर, खुणेगावचे सरपंच नामदेव गायकवाड, सरपंच कापसे, मक्तपूर सरपंच अनिल लहारे, पिचडगावचे सरपंच पोपट हजारे यांच्यासह भानसहिवरे मंडळातील आकाश जोशी, श्वेता काळे, रमेश रिंढे, अशोक गाडेकर, सोमनाथ गलांडे ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते.

## प्रा. कुसुम चव्हाण यांना रसायनशास्त्र विषयात पीएचडी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गणोरे** : येथील प्राचार्य कुसुम चव्हाण यांनी रसायनशास्त्र विषयात पीएचडी पदवी संपादन केली आहे. त्या अभिनव शिक्षण संस्थेचे अभिनव कॉलेज ऑफ सायन्स महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य आहे.

सनराईज विद्यापीठ अलवर राजस्थान या यूजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठातून आपला संशोधन प्रबंध पूर्ण केला आहे. प्रा कुसुम चव्हाण यांना डॉ .हेमंत कुमार सिंग यांचे मार्गदर्शन लाभले त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन कार्य यशस्वीरित्या पूर्णत्वास नेले .

शैक्षणिक क्षेत्रात १६ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या



प्रा कुसुम चव्हाण यांनी एम एस सी ,बी एड ,एम एड, बीए जर्नालिझम अशी उच्च शैक्षणिक पात्रता संपादन केली आहे.त्यांनी आत्तापर्यंत नऊ संशोधन लेख प्रकाशित केले असून चार राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग नोंदवला आहे तसेच एक पेटंट व एक पुस्तक देखील प्रकाशित केले आहे. त्यामुळे अध्यापनासोबत संशोधन क्षेत्रातही त्यांनी भक्कम स्थान निर्माण केले आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले, संस्थेचे सचिव विक्रम नवले, कॅम्पस डायरेक्टर तथा कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ.जयश्री देशमुख ,संस्थेच्या सहसचिव प्राचार्य अल्फोंसा डी, प्रशासन अधिकारी दिलीप कुमार मंडलिक ,सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.गणोरे येथील डॉ .संतोष चव्हाण यांच्या त्या पत्नी आहेत.प्रा कुसुम चव्हाण यांच्या या यशामध्ये पती, कुटुंबीय व मित्रपरिवार यांच्या पाठिंब्यामुळेच त्यांनी हे यश संपादन केले असल्याचे भावनांचा त्यांनी व्यक्त केली आहे.

## श्रीरामपुरात डेंग्यू-मलेरिया मुक्तीसाठी जनजागृती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वडाळा महादेव** : वाढत्या पावसाळी आजारांच्या पार्श्वभूमीवर, श्रीरामपूर येथील प्रेमसी रतनसी पटेल हायस्कूल मध्ये डेंग्यू आणि मलेरिया प्रतिबंधात्मक जनजागृतीसाठी आरोग्य व्याख्यान व भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. नेवासा तालुक्यातील भानसहिवरा येथील सुलोचना बेल्हेकर सामाजिक व बहुउद्देशीय शिक्षण संस्था




संचलित, संत ज्ञानेश्वर शिक्षण शास्त्र (बी.एड.) महाविद्यालयाच्या छात्र-अध्यापकांनी या विशेष उपक्रमाचे आयोजन केले होते. तज्ज्ञांचे मार्गदर्शन: ''प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय'' कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. श्रीरामपूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. नागरगोजे सर यांनी मुख्य वक्ता म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. डेंग्यू आणि मलेरिया हे दोन्ही आजार डासांमुळे पसरत असल्याने, साचलेले पाणी उपसणे, स्वच्छता राखणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे किती महत्त्वाचे आहे, यावर त्यांनी सविस्तर प्रकाश टाकला. जनजागृती रॅलीला मोठा प्रतिसादव्याख्यानानंतर महाविद्यालयाच्या छात्र-अध्यापकांनी हातात आकर्षक पोस्टर्स आणि घोषवाक्ये घेऊन परिसरात रॅली काढली. अशा जनजागृतीपर कार्यक्रमांमुळे समाजात आरोग्याप्रती सजकता निर्माण होते आणि एक सकारात्मक संदेश जातो.''डॉ. सुरेश पाटील बेल्हेकर (अध्यक्ष, सुलोचना बेल्हेकर संस्था) मान्यवरांची उपस्थिती व सहकार्य उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या स्वाती गव्हाणे प्रा मनिषा भोईटे व प्रा. शेखर जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रेमसी रतनसी पटेल हायस्कूलचे मुख्याध्यापक शेवाळे व उपमुख्याध्यापक मेहेत्रे यांच्यासह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रामनवमी उत्सव निमित्त भव्य सूर्यनमस्कार स्पर्धा


प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** ; तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्री श्री रविशंकर विद्या मंदिर शाळा तसेच दि आर्ट ऑफ लिविंग संस्थेच्या प्रोजेक्ट भारत अंतर्गत श्रीरामनवमी उत्सवानिमित्त भव्य अशा सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. अहिल्यानगर येथे दि आर्ट ऑफ लिविंग संस्थेचे सावेडी येथील गावडे मळा या ठिकाणी श्री श्री रविशंकर यांचे ध्यान मंदिर असून या ठिकाणी भव्य अशा सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन रामनवमीच्या निमित्ताने करण्यात आले आहे. या स्पर्धेचा आनंद सर्व नगर जिल्ह्यातील योग साधकांनी घ्यावा असे आवाहन श्री श्री रविशंकर विद्यामंदिर शाळेचे संस्थापक अध्यक्ष संदीप कसार तसेच आयोजक पद्माकर कुलकर्णी व सुभाष गड्डम यांनी केले आहे.



## संजय गांधी निराधार योजनेचे माजी अध्यक्ष माधवराव हासे यांचे निधन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे कट्टर समर्थक , संगमनेर तालुका पंचायत समितीचे माजी सदस्य तसेच संजय गांधी निराधार योजनेचे माजी अध्यक्ष माधवराव रामभाऊ हासे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अकस्मात निधन झाले.माधवराव हासे हे राजापूर गावचे माजी सरपंच तथा काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कायम राजकीय आणि सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला. संगमनेर तालुका पंचायत समिती सदस्य यानंतर त्यांनी संगमनेर तालुका संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्षपद त्यांनी अत्यंत कार्यक्षमपणे सांभाळले , अत्यंत गोरगरीब निराधार माणसांना त्यांनी शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला. महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये लोकनेते नामदार थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली कोरोना संकटात त्यांनी अत्यंत समर्थपणे काम केले. याचबरोबर गावांमधील मृत झालेल्या व्यक्तीच्या अंत्यविधीसाठी मोफत लाकूड देण्याचे कायम काम त्यांनी केले. सर्वांना सोबत घेऊन जाण्याची पद्धत हसत खेळत जीवन जगत लहान मोठ्यांशी त्यांची मैत्री होती. एक दिलदार पणाचे कार्यकर्ते असलेले माधवराव हासे राजापूर मध्ये माधव शेठ नावाने प्रसिद्ध होते . त्यांच्या आकस्मात निधनाने त्यांच्या परिवाराबरोबर राजापूर व संगमनेर तालुक्यात मोठी पोकळी निर्माण झाली, मृत समय त्यांचे वय ६१ वर्षे होते त्यांच्या पश्चात पत्नी ,दोन मुले व दोन मुली असा परिवार आहे.

# ॲग्री क्लिनिक ॲग्री बिझनेस कोर्स तरुणांना स्वयं रोजगाराची नवी दिशा : शैलेश देशमुख

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : ॲग्री क्लीनिक आणि ॲग्री बिझनेस च्या माध्यमातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या शेतकरी बांधवांसाठी करतानाच कृषी क्षेत्रातून कृषी पदवीधराने उद्योजक व्हावे. कृषी क्षेत्रात मोठी करिअर संधी असून नोकरी करणारे नाही तर नोकरी देणारे उद्योजक कृषी क्षेत्रात घडावेत यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार हे नेहमीच प्रयत्नशील आहे. कृषी क्षेत्रात स्टार्टअप ची उभारणी ही येणाऱ्या काळात कृषी क्षेत्राला नवतंत्रज्ञान देणारे ठरेल असे प्रतिपादन बाभळेश्वरच्या कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी केले.

कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर येथे संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या



माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील , संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील , कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम , संस्थेचे सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयात आणि मॅनेज हैदराबाद अंतर्गत ४५ आयोजितॲग्री क्लिनिक ॲग्री बिझनेस प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी देशमुख बोलत होते . यावेळी मृदा विभाग प्रमुख शांताराम सोनवणे, उद्यान विद्या विभागाचे डॉ विलास घुले, गृह विज्ञान विभागाच्या सज्जला लांडगे, पशु विज्ञान विभागाचे डॉ विठ्ठल विखे,कृषी विस्तार विभागाच्या डॉ प्रियंका खर्डे, कैलास लोंढे, संगीता पवार आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

या प्रशिक्षणांमध्ये ग्रामीण युवकांसाठी रोजगार आणि व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध करून देणारा ठरेल तसेच, स्थानिक अर्थव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासही मदत होईल असे शैलेश देशमुख सांगून प्रशिक्षणार्थी या संधीमुळे आता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उत्पादक शेती आणि व्यवसाय सुरू करण्यास सज्ज झाले आहेत.

४५ दिवसीय प्रशिक्षणादरम्यान व्यवसाय नियोजन, मार्केटिंग, बिझनेस मॉडेल, कर्ज प्रक्रिया, कृषी सेवा आणि आधुनिक तंत्रज्ञान याबद्दल सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणातील विषयांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील कृषी व्यवस्थापनासाठी सक्षम बनवले. शेतकरी-केंद्रित पद्धती, सेंद्रिय शेती, कृषी उत्पादनाचे नियोजन, बाजारपेठेतील संधी आणि उद्योजकता कौशल्य यावर भर देण्यात आला. प्रात्यक्षिके, क्षेत्रभेटी आणि संवादात्मक सत्रांमुळे सहभागींच्या व्यावहारिक कौशल्यांचा समृद्ध विकास झाला. या बॅच मध्ये एकूण २४ प्रशिक्षणार्थी होते.

## नशिबाची परिक्षा

**गुरुवार दि .२६ मार्च २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२३<br>१५०<br>११४ | ६-५ | १४०<br>२३०<br>७८० | जोड<br>६०-१५-२४<br>७३-०९ |

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२०<br>६७०<br>५८० | ३-९ | १२६<br>४५०<br>१४४ | जोड<br>३१-०९-४७-<br>८५-९२ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १४९<br>२४८<br>४४६ | ४-१ | १२८<br>२९०<br>२२७ | जोड<br>४६-८१-०५<br>७९-१२ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 139 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | | | |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द•ख•ल

## श्रीराम नवमी व हनुमान जयंतीनिमित्त रामकथेचे आयोजन

**भाळवणी** : पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील हनुमान मंदिराच्या प्रांगणात गुरुवार दि. २६/०३/२०२६ ते ०२/०४/२०२६ या कालावधीत राम कथेच्या सप्ताहाचे आयोजन येथील हनुमान मंदिर, सकल हिंदू समाज व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. कथाकार व किर्तनकार प.पु. अनुपानंद सद्गुरू श्री. विजयानंद महाराज (छ. संभाजीनगर) हे रामकथेचे व्यासपीठ चालवणार आहेत. गुरुवार दि. २६ रोजी कथेला सुरुवात होणार असून दररोज सायंकाळी ७ ते १० या वेळेत ही राम कथा होणार असून त्यानंतर दररोज थोर अन्नदत्यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २६ रोजी रामायण महात्म्य, दि. २७ रोजी श्री. राम जन्म, दि. २८ रोजी सीता-राम विवाह, दि. २९ रोजी श्रीराम वनवास, भरत भेट, दि. ३० रोजी सीता हरण, जटायू उद्धार, दि. ३१ रोजी श्रीराम - हनुमान भेट, दि. १ एप्रिल रोजी लंका दहन, रावण, कुंभकर्ण वध, व दि. २ रोजी सकाळी १०ते १२ या वेळेत हनुमान जन्मोत्सवानिमित्त किर्तन होणार आहे. या संपुर्ण कार्यक्रमाचा परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## डहाळे यांना देशसेवेची संधी : आ. संग्राम जगताप

**अहिल्यानगर** : प्रवर्तन संचालनालय (ईडी) मध्ये विधी अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल तसेच विधी क्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण पीएचडी पदवी संपादन केल्याबद्दल अ‍ॅड. डॉ. गौरव सुनिल डहाळे यांचा अहिल्यानगर जिल्ह्यातील सराफ सुवर्णकार समाजाच्या वतीने गौरव सत्कार करण्यात आला. कमी वयात हे यश संपादन करणारे डहाळे हे जिल्ह्यातील पहिले युवक ठरले असून, त्यांच्या या यशामुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. शहरातील संजोग लॉन येथे आयोजित सन्मान सोहळा आमदार संग्राम जगताप व मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी मजुर फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष दादासाहेब जगताप, श्यामशेठ देडगावकर, सराफ सुवर्णकार संरक्षण समितीचे चेअरमन उमेश बुऱ्हाडे (बारामती), विशाल वेदपाठक, स्केटिंग प्रशिक्षक प्रशांत पाटोळे, पीएचडी मार्गदर्शक अ‍ॅड. समीर चव्हाण, उपप्राचार्य गोकुळदास लोखंडे, अ‍ॅड. राजेंद्र सेलोत, अ‍ॅड. अनिल सरोदे,

अ‍ॅड. आशिष पाटणकर, सुरज पालबंश, जॉन पठारे, वैभव बागुल, अ‍ॅड. श्रेयश देवरे, अ‍ॅड. ललित गुंदेचा, सुभाषशेठ कायगावकर, प्रकाश लोळगे, मयूर कुलथे, नगरसेवक मयूर (बाली) बांगरे, ड. प्रसन्न बिंगी, अजित जगताप, राहुल टाकळकर, सुनील मंचरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना करिअर आणि रोजगाराच्या संधीबद्दल मार्गदर्शन

**अहिल्यानगर** : शिक्षणानंतर करिअरच्या विविध वाटा आणि रोजगाराच्या संधी याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे मासूम संस्थेच्या माध्यम ातून मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसा विविध ठिकाणी काम करून रात्री शिक्षण घेणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना समाजात सक्षमपणे उभे करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाला इयत्ता ८ वी ते १२ वीतील आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रात्रशाळेच्या चेअरमन ज्योतीताई कुलकर्णी होत्या. यावेळी मासूम संस्थेच्या सीनियर प्रोग्राम मॅनेजर गजाला शेख, प्लेसमेंट ऑफिसर अनुराधा पवार, इंडियन फॅशन अ‍ॅकॅडमीच्या संचलिका रचना काकडे, प्राचार्य व मासूम संस्थेचे सल्लागार सदस्य सुनिल सुसरे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

ज्योतीताई कुलकर्णी म्हणाल्या की, रात्रशाळेतील विद्यार्थी हे खऱ्या अर्थाने जिद्दीने मेहनत करत आहेत परंतु कौशल्याचे प्रमाणपत्र नसल्याने मेहनतीचे योग्य मानधन मिळत नसल्याने त्यांना कौशल्य व कौशल्याच्या प्रमाणपत्राचे महत्त्व सांगितले. दिवसभर काम करूनही शिक्षण घेण्याची त्यांची चिकाटी प्रेरणादायी आहे. अशा विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाले तर ते नक्कीच आयुष्यात मोठे यश मिळवू शकतात. हा उपक्रम त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## वर्धापनदिनानिमित्त रंगला भरतनाट्यम नृत्याविष्कार

**अहिल्यानगर** : प्रभू श्रीरामांच्या वास्तवाने पावन झालेल्या भूमीतील डोंगर-दरीचा परिसर... कानावर पडणारा श्रीरामस्तुतीची गीते... त्या गीतांवर भल्या सकाळी भरतनाट्यमचा नृत्याविष्कार करणाऱ्या तरुणी... आणि या सुमधूर कलाविष्काराला उत्स्फुर्त दाद देणारे शेकडो निसर्गप्रेमी... अशा भारावलेल्या वातावरणात नगरजवळील डोंगरगणच्या आनंददरीचा परिसर पूर्णपणे भारावून गेला होता... श्रीरामनवमी आणि ट्रेक्‍म्प गिर्यारोहण संस्थेच्या १३ व्या वर्धापनदिनिमित्त आयोजित आनंददरी येथील ट्रेकने पर्यटकांना अनोखी सांगितिक मेजवाणी मिळाली.

नगरमधील मानसोपचार तज्ज्ञ असलेल्या विशाल लाहोटी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या ट्रेक्‍म्प संस्थेला १३ वर्षे पूर्ण झाली. सह्याद्रीच्या डोंगररांगांतील अनेक गडकिल्ले, पर्यटनस्थळांवर जाऊन निसर्गाचा आनंद घेण्याच्या सवयीतून या संस्थेचा जन्म झाला. हजारो नगरकरांना या संस्थेने ट्रेकची सवय लावली. या संस्थेच्या वर्धापनदिनानिमि त्त श्रीरामनवमीचे औचित्य साधून श्रीरामांचे वास्तव्य असलेल्या डोंगरगण परिसरातील आनंददरी येथे ट्रेकचे आयोजन करण्यात आले होते. नगरमधून सुम ारे ३०० पर्यटक भल्या पहाटे वांबोरी घाटाखालील गणपती मंदिराजवळ पोहोचले. तेथून डोंगर-दरीतून चालत आनंददरीतील तलावाजवळ पोहोचले.

# साखरपुड्यानंतर २० लाखांची मागणी

**✻ नकार दिल्यावर खासगी फोटो व्हायरल; श्रीगोंदा कनेक्शनमुळे खळबळ**

**✻ पोकलेन मशीनसाठी दबाव; तरुणीची बदनामी;वारजे माळवाडी पोलिसांत गुन्हा**

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : लग्न ठरलेल्या तरुणीकडून पोकलेन मशीन खरेदीसाठी २० लाख रुपयांची मागणी करून, रक्कम न मिळाल्याने तिचे खासगी फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करून बदनामी केल्याप्रकरणी नवरदेवाविरुद्ध वारजे माळवाडी (अंकित कर्वे नगर चौकी) येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजयसिंह संतोष गुंड (रा. मढेवडगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुणी व आरोपी यांचा मार्च २०२५ मध्ये साखरपुडा झाला होता. त्यानंतर दोघांम ध्ये घरच्यांच्या संमतीने मोबाईलवरून संवाद सुरू होता.

डिसेंबर २०२५ मध्ये बाहेर फिरायला गेले असताना काढलेले फोटो आरोपीने आपल्या ताब्यात ठेवले.यानंतर आरोपीने व्यवसायासाठी पोकलेन मशीन घेण्यासाठी तुझ्या वडिलांकडून २० लाख रुपये घेऊन दे, अन्यथा फोटो व्हायरल करीन अशी धमकी देत वारंवार पैशांची मागणी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. प्रकार उघड झाल्यानंतर तरुणीच्या कुटुंबीयांनी साखरपुडा रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी आरोपीच्या कुटुंबीयांनी फोटो डिलीट करण्याची हमी दिल्याचेही सांगण्यात आले आहे.मात्र, १२ फेब्रुवारी २०२६ रोजी आरोपीने पुण्यातील तरुणीच्या घरी जाऊन गोंधळ घालत पुन्हा पैशांची मागणी केली. लग्नाला तयार झाली नाहीस तर जीवे मारून टाकीन अशी धमकी देत तिच्या इच्छेविरुद्ध वर्तन केल्याचा आरोप आहे. त्यानंतर फोनवरूनही धमक्या देत दबाव टाकण्यात आला.

तसेच, २२ मार्च २०२६ रोजी आरोपीने तरुणीच्या गावातील व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर खासगी फोटो व चॅटिंगचे स्क्रीनशॉट शेअर करून बदनामी केल्याचे उघड झाले. या घटनेनंतर पीडितेने पोलिसांत धाव घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

### ■ ‘राजकीय वर्तुळ’ चर्चेत? (तपासाधीन)

या प्रकरणातील आरोपी हा श्रीगोंदा तालुक्यात ठेकेदारी क्षेत्रात कार्यरत असल्याची चर्चा असून, त्याचे कुटुंब स्थानिक राजकीय वर्तुळाशी जोडलेले असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. काहींकडून त्याच्या वडिलांबाबत एका सत्ताधारी आमदाराचे स्वीय सहाय्यक असल्याचे दावे केले जात आहेत. तसेच, तालुक्यातील एका संस्थेत आरोपीसाठी स्वतंत्र सोयी उपलब्ध असल्याबाबतही विद्यार्थी वर्गात चर्चा असल्याचे बोलले जाते.

मात्र, या सर्व बाबींना अधिकृत दुजोरा अद्याप मिळालेला नसून सत्यता तपासातूनच स्पष्ट होणार असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले.

### ■ साखरपुड्याच्या विश्वासाला पैशाचा दर

साखरपुड्याच्या विश्वासाला पैशांचा दर लावून, नकार दिल्यावर बदनामीचे शस्त्र उगारणे हा गुन्हा फक्त कायद्याचा नाही, तर नात्यांच्या विश्वासघाताचाही आहे. या प्रकरणात संबंधित आरोपीवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## हिंदू असल्याचा अभिमान बाळगा : हभप देवळेकर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**करंजी** – हिंदू धर्मावरच सातत्याने टीका टिप्पणी केली जाते. सातत्याने हिंदू समाजाला बदनाम करण्याचे षडयंत्र रचले जाते. त्यामुळे सर्व धर्म समभाव संकल्पना चुकीची असून हिंदू असल्याचा अभिमान प्रत्येक हिंदू तरुण-तरुणी महिला पुरुषांनी बाळाला पाहिजे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्यामुळे आपल्याला आज जगण्याचा अभिमान आणि स्वाभिमान मिळाला असल्याचे प्रतिपादन हिंदू भूषण अनिल महाराज देवळेकर यांनी केले. करंजी ता.पाथर्डी येथे उत्तरेश्वर सभा मंडपामध्ये मंगळवारी सायंकाळी करंजी ,दगडवाडी, भोसे, सातवड, वैजूबाभुळगाव, लोहसर , खांडगाव या गावच्या ग्रामस्थांच्या वतीने हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी हिंदू भूषण देवळेकर महाराज यांचे कीर्तन पार पडले. यावेळी ते बोलत होते. यावेळी अशोक महाराज पालवे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा प्रचारक दीपक पारेकर उपस्थित होते.



यावेळी बोलताना देवळेकर महाराज म्हणाले की छत्रपती संभाजी महाराज यांचे झालेले हाल.त्यांना दिलेल्या म रण यातना हिंदू समाज बांधवांनी विसरू नये. जाती करता आणि माती करता जीवाची बाजी लावणारा हा महाराज या म हाराजाचे कार्य कदापि विसरू नका. हिंदू समाजाने एकत्र होऊन संघटित पुणे एकमेकांना सहकार्य करण्याची गरज आहे सावध व्हा जागे व्हा आणि धर्मकार्यासाठी एकत्र या येण्याचे आवाहन अनिल महाराज देवळेकर यांनी यावेळी केले. यावेळी महंत ज्ञानेश्वर महाराज कराळे, भागवत महाराज उंबरेकर, शंकर महाराज ससे, पंढरीनाथ महाराज टेमकर, महादेव महाराज वाढेकर, रवींद्रदेवा जोशी यांच्यासह करंजी दगडवाडी भोसे, वैजूबाभळगाव, सातवड ,लोहसर , खांडगाव येथील हिंदू समाज बांधव महिला भगिनी या कार्यक्रम ाप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते. करंजीत पहिल्यांदाच पार पडलेल्या हिंदू संमेलनाला करंजीसह परिसरातील हिंदू समाज बांधवांचा उत्स्फुर्त असा प्रतिसाद मिळाला.

## संरक्षित पुरातत्व क्षेत्रात बेकायदेशीर शाळा बांधकाम; मुख्याध्यापकावर गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण येथे संरक्षित पुरातत्व क्षेत्रात परवानगीशिवाय शाळेचे बांधकाम केल्याप्रकरणी मुख्याध्यापकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे प्रशासनाच्या देखरेखीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गु.र.नं. २४४/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ तसेच प्राचीन स्मारक आणि पुरातत्वीय स्थळ व अवशेष अधिनियम १९५८ चे कलम २०() व ३०() अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे.

फिर्यादी हरिश जिवनलाल दसरे (वय ५०), संरक्षण सहायक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी मांडवगण येथील देवी मंदिरालगतच्या सुमारे १०० मीटर संरक्षित क्षेत्रात कोणतीही अधिकृत परवानगी न घेता शाळेचे बांधकाम सुरू करण्यात आले. विशेष म्हणजे मंदिरापासून केवळ ५ मीटर अंतरावरच हे बांधकाम करण्यात आले असून ते काही प्रमाणात पूर्णही झाले आहे.

या प्रकाराची माहिती समोर आल्यानंतर २३ मार्च २०२६ रोजी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अद्याप आरोपीला अटक करण्यात आलेली नाही.

या प्रकरणाचा तपास पोलीस नाईक एस. जी. जाधव करत असून पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या म ार्गदर्शनाखाली पुढील कारवाई सुरू आहे.

**परवानगी शिवाय बांधकाम करणे चुकीचेच-पोलीस अधिकारी**

पुरातत्व संरक्षित क्षेत्रात परवानगीशिवाय कोणतेही बांधकाम करणे हा गंभीर कायदेशीर गुन्हा आहे. संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल. पोलीस अधिकारी यांनी बोलताना सांगितले.

# अल्पवयीन मुलींची छेडछाड : चार नराधमांना ठोकल्या बेड्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पारनेर** : अहमदनगर जिल्हातील पारनेर तालुक्यातील कान्हूर पठार येथे अल्पवयीन मुलींची छेडछाड करून महिला अत्याचाराचा गंभीर गुन्हा करणाऱ्या चार नराधम ांना जेरबंद करण्यात पारनेर पोलिसांना यश आले आहे. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली असून, पीडित मुलींच्या पालकांमध्ये भीतीचे वातावरण होते. मात्र, पोलिसांनी अत्यंत शिताफीने तपास करून फरार असलेल्या चारही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

या प्रकरणाची सविस्तर माहिती अशी की, कान्हूर पठार येथील विशाल अनिल हुलावळे, प्रथमेश शंकर लोंढे, वैभव पोपट लोंढे आणि रोहीत संजय चत्तर या चौघांनी अल्पवयीन मुलींशी अश्लील वर्तन करत त्यांची छेडछाड केली होती. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात




भारतीय न्याय संहिता कलम ७४, १३७ (२), ३५१ (२) सह बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (पोक्सो) कलम ८, १२, १८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून हे चौघेही आरोपी फरार झाले होते आणि पोलीस त्यांचा कसून शोध घेत होते.

दिनांक २३ मार्च २०२६ रोजी पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, हे चारही आरोपी पारनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीतच एका गुप्त ठिकाणी लपून बसले आहेत. माहितीची खातरजमा होताच, पोनि खेडकर यांनी तातडीने तपास अधिकारी रंजीत मारग आणि डीबी पथकाला पाचारण केले. या पथकाने रात्रीच्या सुमारास सापळा रचून विशाल हुलावळे, प्रथमेश लोंढे, वैभव लोंढे आणि रोहीत चत्तर या चौघांना ताब्यात घेतले. रात्री ११:२५ च्या सुमारास त्यांना अधिकृतरीत्या अटक करण्यात आली.

सदरची धाडसी कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या म ार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात पोनि संतोष खेडकर, रंजीत मारग, पी. आर. कांबळे, के. एन. लगड, ए. जी. धामणे, एस. बी. वाघ, डोंगरे, देविदास अकोलकर, जगदीश बुधवंत आणि एस. एस. शिंदे यांचा समावेश होता.

अटकेत असलेल्या या आरोपींना आज, २४ मार्च रोजी अहिल्यानगर येथील विशेष न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्व आरोपींना २७ म ार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या आरोपींनी यापूर्वी अशा प्रकारचे इतर काही गुन्हे केले आहेत का, याचा तपास आता पोलीस करत असून लवकरच या प्रकरणाचा सविस्तर उलगडा होण्याची शक्यता आहे.

## निघोज येथील शाळेची एनएसई स्कॉलरशीप परीक्षेत राज्यस्तरावर उत्तुंग भरारी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : निघोज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी छ .ड .ए स्कॉलरशीप परीक्षेत राज्यस्तरावर उतूंग भरारी घेतली असून यामध्ये वेदिका किरण बोटकर - १८०/२०० राज्यात -नववी अर्णवी राहूल पांढरकर -१७४/२०० राज्यात - बारावी काव्या अभिमन्यू पवार - १७२ / २०० राज्यात तेरावी आली असून या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक गणपतराव देठे सर, ज्येष्ठ शिक्षक शिंदे सर, ज्येष्ठ शिक्षिका लंके मॅडम तसेच शिक्षीका लाळगे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या विद्यार्थ्यांचे सरपंच चित्राताई वराळ पाटील, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, स्कूल कमीटीचे अध्यक्ष रोहन उनवणे तसेच




पत्रकार संघ यांनी अभिनंदन केले आहे. लवकरच या विद्यार्थ्यांचा सत्कार पत्रकार संघाच्या वतीने करण्यात येणार आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत येथील शिक्षकांनी शाळेअंतर्गत येणाऱ्या सर्व परिक्षेत राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय यश संपादन केले असून सध्या निघोज परिसरातील कुंडवस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तनपुरे वस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांची विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी स्पर्धा सुरू असून या तीनही जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी सध्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय नाव उंचावत असून या शाळांनी इंग्रजी शाळांनाही मागे टाकले असल्याची प्रतिक्रिया जनतेतून व्यक्त होत आहे. गेली पंधरा ते वीस वर्षांपासून या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी स्कॉलरशिप परिक्षा असो की ईतर परिक्षेमध्ये मोठ्या गुणवत्तेने उत्तीर्ण होत असल्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळकडील पटसंख्या झपाट्याने वाढत आहेत. सध्या शेतीमालाला भाव नाही तसेच ईतर जिवणावश्यक वस्तूंचे भाव वाढत असल्याने पाल्य इंग्रजी शाळेत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापेक्षा मोफत व चांगले शिक्षण मिळण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रवेश घेत असल्याचे चित्र ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात दिसत आहे.

## खरात ज्योतिष नाही- ज्योतिष तज्ञ घोलप

**अहिल्यानगर** : अशोक खरात यांचा ज्योतिष शास्त्राशी कुठलाही संबंध नाही. स्वतःला ज्योतिष भासवून व कुठल्याही देव-देवतांचे नाव वापरून, बोट कापणे, चिंचोके देणे असे थोतांड करणे हे निव्वळ लोकांना भीती दाखवून व ब्रेनवॉश करून स्वतःला हवे ते साध्य करून घेण्याचा प्रकार आहे. मी स्वतः कामख्या देवीचा भक्त आहे. व मी दर महिन्याला माँ कामख्या देवी, गुवाहाटी येथे दर्शनासाठी जातो. पण कामख्या शास्त्रात व ईतर कुठल्याही शास्त्रात असे प्रकार लिहिलेले माझ्या पाहण्यात कधीही आले नाहीत. असे ज्योतिष तज्ञ संतोष घोलप (आहिल्यानगर) यांनी सांगितले. घोलप हे चक्रीय अष्टकवर्ग ज्योतिष या सर्वात प्राचीन, अत्यंत गहन व अचूक ज्योतिष पद्धतीचे महाराष्ट्रातील एकमेव अभ्यासक आहेत. घोलप यांनी सोशल मिडीयावरील विविध ज्योतिष समूहांना संघटित करून सोशल मि डीयावर एक ज्योतिष महासंघाची निर्मिती करून त्याचे प्रमुखपद भूषवले होते. व त्यातून सोशल मिडीयावरून स्वतःला ज्योतिष भासवणाऱ्या असंख्य भामट्यांचा बंदोबस्त केला होता.

अशोक खरात यांना ज्योतिष शास्त्राचे कुठलेही ज्ञान नाही, असे त्यांच्या कृतीतून दिसून येते. किंबहुना, ज्योतिष शास्त्रासारख्या अत्यंत प्राचीन व गहन विषयाचे ज्ञान मिळवण्याची पात्रता अशोक खरात सारख्या व्यक्तीकडे नसते. असे अनेक भोंदू व्यक्ती आपल्या सोईनुसार ज्योतिष शास्त्राचा बुरखा घेऊन लोकांना म ूर्ख बनवण्याचे काम करत आहेत.

### दादा पाटील महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक समारंभात

# जागर आध्यात्मिक लोकशाहीचे विद्यार्थ्यांकडून सादरीकरण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : दादा पाटील महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात यंदा जागर आध्यात्मिक लोकशाहीचा या संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सर्वांनीच विशेष कौतुक करीत सादरीकरण केलेल्या विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांची वाहवा मि ळवली. आजच्या काळात उसवत चाललेली सामाजिक विण लक्षात घेता विविध जाती धम ांच्या साधुसंतांनी एकत्र येत जी आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली त्याचाच गजर प्रत्यक्ष दाखवत एकतेचा, समतेचा व बंधुभावाचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

दादा पाटील महाविद्यालयामध्ये नुकताच वार्षिक पारितोषिक समारंभ संपन्न झाला.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांनी आपल्या संकल्पनेतून सांस्कृतिक कार्यक्रमाचे स्वरूप पूर्णपणे बदलत यंदा जागर आध्यात्मिक लोकशाहीचा अंमलात आणली. यात श्री चक्रधर स्वामींपासून सुरुवात करीत संत ज्ञानेश्वर महाराज भावंडे बहिष्कृत प्रकरण व नाट्य जीवन प्रसंग, वासुदेव नृत्यातून केले जाणारे समाजप्रबोधन, संत नामदेव महाराजांनी केलेला वारकरी संप्रदायाचा विस्तार, संत नामदेवांच्या घरी मोलकरीण असलेल्या संत जनाबाईची अधिकारवाणी, संत चोखामेळा व संत कर्ममेळा यांनी व्यक्त केलेली हीन जातीत जन्मास आल्याची खंत, संत सावता माळी, सेना न्हावी, नरहरी सोनार, गोरोबा कुंभार यांचा कर्मसिद्धांत, संत मीराबाई यांची मधुरा भक्ती , संत कबीर व संत तुकाराम यांचा रोखठोक व परखड विचार, संत सखुबाईचा सासुरवास, वारांगगणेची मुलगी म्हणून हिणवले गेलेल्या संत कान्होपात्राची तळमळ, संत एकनाथ महाराज गोदावरी स्नान प्रसंग व भारुड, संत शेख महंमद महाराज, संत निळोबाराय, संत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज, श्री संत सदगुरू गोदड महाराज चरित्र यांचे सादरीकरण गवळण, अभंग, भारुड, वारी , रिंगण , फुगडी लीळा,, नाट्य, दृश्य,नृत्य आदींच्या माध्यमातून केले. १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी ३ तास प्रेक्षकांना खिळवून ठेवत अप्रतिम सादरीकरण केले. विद्यार्थ्यांचा वैचारिक दृष्टिकोन परिपक्व व्हावा तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकास घडावा यावर आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या सादरीकरणात बुरगुंडा होईल तुला, संत तुकाराम चरित्र यास प्रेक्षकांनी विशेष दाद दिली. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वता पटकथा लिहीत उत्कृष्टपणे सादर केले. प्रकाश शिंदे, अजित पवार, साक्षी वाघ, दिग्विजय रानमाळ, कृष्णा शेटे, यश खेतमाळस, लखन शिंदे या विद्यार्थ्यांनी कोरिओग्राफीत सहकार्य केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभागाचे चेअरमन डॉ. प्रमोद परदेशी, प्रा. सुखदेव कोल्हे, प्रा. स्वप्निल म्हस्के, प्रा. राम काळे, प्रा. वृद्धेश्वर गरुड, प्रा. किरण भोसले, प्रा. बाळासाहेब धांडे, प्रा. किर्ता वसावे, डॉ प्रतिमा पवार, डॉ. बेबी खिलारे, प्रा. मीना खेतमाळीस, प्रा. सुवर्णा गायकवाड, प्रा. शिल्पा तोडमल, प्रा. अनिता परकाळे, प्रा. तृप्ती निंभोरे यांनी परिश्रम घेतले.

द•ख•ल

## निरक्षरांसाठी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान चाचणी २९ मार्च रोजी

**पुणे :** राज्यातील निरक्षर व्यक्तींमध्ये मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान विकसित करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत येत्या रविवारी, दि. २९ मार्च २०२६ रोजी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी (ऋङछअढ) घेण्यात येणार आहे. ही चाचणी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर होणार असून, परीक्षेचा कालावधी ३ तासांचा असेल. दिव्यांग व्यक्तींना अतिरिक्त ६० मिनिटांचा वेळ देण्यात येणार आहे. या चाचणीद्वारे वाचन, लेखन व संख्याज्ञान या तीन घटकांमध्ये प्रत्येकी ५० गुणांसह एकूण १५० गुणांची परीक्षा घेतली जाणार आहे. परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक घटकात किमान ३३ टक्के गुण आवश्यक राहतील. सदर परीक्षा मराठीसह हिंदी, इंग्रजी, गुजराती, उर्दू, कन्नड, तेलुगू, तमिळ व बंगाली या भाषांमध्ये घेण्यात येणार आहे. परीक्षा ऑफलाईन पद्धतीने होणार असून प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका एकत्रित स्वरूपात दिली जाईल. उल्लास ॲपवर नोंदणी केलेल्या असाक्षर व्यक्तींना परीक्षेस पात्रता राहणार असून, नोंदणी नसल्यास चाचणीच्या दिवशीही नोंदणी करून परीक्षा देता येणार आहे. परीक्षेस येताना उमेदवारांनी स्वतःचा फोटो व ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. राज्यात सुमारे ३ लाख असाक्षर व्यक्ती ही चाचणी देणार असल्याची माहिती शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून देण्यात आली आहे. संबंधित सर्वांनी नियोजित परीक्षा केंद्रावर वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जनरल निरीक्षक बिद्यानंद सिंग यांनी बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा घेतला आढावा

**बारामती :** – बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक दि. २३ एप्रिल २०२६ रोजी होणार असून, त्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून नियुक्त जनरल निरीक्षक बिद्यानंद सिंग यांनी तहसिल कार्यालय बारामती येथे बैठक घेऊन निवडणुकीच्या तयारीचा सखोल आढावा घेतला. बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांकडून निवडणुकीची पूर्वतयारी, कायदा व सुव्यवस्था, भरारी पथक (ऋडढ) व स्थिर देखरेख पथक (डडढ) यांचे नियोजन, तसेच आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी याबाबत तपशीलवार माहिती घेण्यात आली. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व शांततेत पार पडावी, यासाठी आवश्यक त्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. बारामती विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी निवडणुकीसंदर्भात काही तक्रारी अथवा सूचना असल्यास जनरल निरीक्षक बिद्यानंद सिंग (मो. ७६६६६३९८५९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी केले आहे.



## गारपिटीमुळे कलिंगड उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**दिवे :** पुरंदर तालुक्यातील शेतकरी उन्हाळ्यात कलिंगडाची मोठ्या प्रमाणात लागवड करतात यामुळे उन्हाळ्यात चार पैसे शेतकऱ्यांच्या हातात पडतात मात्र यावर्षी गारपिटिने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तालुक्यातील मावडी सुपे येथील शेतकरी तुषार बहिरट यांनी साडेतीन एकर क्षेत्रावर कलिंगड लागवड केली होती. यासाठी त्यांनी सुमारे अडीच लाख रुपयांचा खर्च केला होता. मात्र, मधल्या काळात झालेल्या अवकाळी गारपिटीमुळे त्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.गारपिटीमुळे कलिंगडावर चट्टे पडल्याने बाजारात या मालाला मागणी नाही. परिणामी, बहिरट यांच्यावर उत्पादन खर्चही निघणार नाही अशा स्थितीत रस्त्यावर मिळेल त्या भावात कलिंगड विकण्याची वेळ आली आहे. सध्या बाजारात दर्जेदार मालालाच मागणी असून, नुकसानग्रस्त कलिंगडाला व्यापाऱ्यांकडून योग्य दर मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शासनाने पंचनामा करून तात्काळ नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. अवकाळी पावसासह गारपिटीच्या तडाख्यामुळे परिसरातील इतर शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान झाले असून, प्रशासनाने याची दखल घेऊन मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# जेजुरीत दुकानाची तोडफोड करणारे पाच आरोपी जेरबंद

## जेजुरी पोलिसांची कारवाई : दोन महिन्यांपूर्वी घडली होती घटना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुरंदर :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीतील नंदी चौकात भंडार खोबरे विक्रेत्याला मारहाण करून दुकानाची तोडफोड करणाऱ्या पाच आरोपींना जेजुरी पोलिसांनी अटक केली.

स्वप्नील जयेंद्र कांबळे वय ३३ रां बुद्ध विहार दिघी पुणे, प्रणय राजू पाटोळे वय २६ ,यश राजू पाटोळे, वय १९ दोघे राहणार काळेवाडी पुणे, सुधीर बाळू पाटोळे वय ३४ व सूरज बाळू पाटोळे वय वय २५ दोघे रा मरकळ पुणे असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत

या प्रकरणाबाबत माहिती अशी की, जेजुरी येथील गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या नंदी चौकात महादेव वाघमारे




यांचे भंडार खोबरे व पेढे विक्रीचे दुकान आहे. दिनांक ३१ जानेवारी रोजी काही भाविक या दुकानासमोर येवून त्यांनी तिथे आपल्या पायातील चपला ठेवण्याचा आग्रह धरला.यावेळी दुकानदार वाघमारे यांनी आमच्या दुकानासमोर चपला ठेवून नका, ज्या ठिकाणी तुम्ही भंडार खोबरे घेतले आहे त्या ठिकाणी चपला ठेवा असे सांगितले. या कारणावरून दुकानदार व भाविक यांच्यात वाद होवून वरील आरोपींनी जमाव जमवून वाघमारे यांना दांडक्याने हातापायाने मारहाण करून दुकानातील भंडार खोबरे, पेढे फेकून देवून दुकानाची मोडतोड करून आरोपी पळून गेले होते.

या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडिया तसेच टिव्ही चॅनल वर व्हायरल झाल्याने नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली होती. दिनांक १ फेब्रुवारी रोजी फिर्यादी वाघमारे यांनी जेजुरी पोलीस स्टेशन मध्ये अज्ञात व्यक्तींवर तक्रार दाखल केली होती.

या मारहाण व तोडफोडीची घटना सोशल मीडियावर व्हायरल झाल्या नंतर पोलिसांनी या व्हिडिओचा आधार घेत दोन आरोपींचे फोटो वॉट्सप ग्रुप वर प्रसारित केले. गोपनीय बातमीदारा कडून माहिती घेत जेजुरी पोलिसांनी पाच आरोपींना ताब्यात घेतले.

या प्रकरणी जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस फौजदार नंदकुमार पिंगळे या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

## सासवडच्या ऐतिहासिक वारशाला दिलासा

### बाळाजी विश्वनाथ पेशवे समाधीच्या जीर्णोद्धारास मंजुरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

"सासवड येथील बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या समाधीचा जीर्णोद्धार हा ऐतिहासिक वारसा जतनासाठी महत्त्वाचा निर्णय आहे. प्राथमिक मान्यता देण्यात आली असून, लवकरच आराखडा मंजूर करून काम पूर्ण करण्यात येईल," असे मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी सांगितले.

**नाझरे सुपे :** सासवड ता.पुरंदर मराठा साम्राज्याचे पहिले पेशवे श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या सासवड येथील कऱ्हा व चांबळी नद्यांच्या संगमावर, संगमेश्वर मंदिरासमोरील ऐतिहासिक समाधीच्या जीर्णोद्धारास राज्य शासनाने प्राथमिक मंजुरी दिली आहे. त्यामुळे पुरंदर तालुक्यातील ऐतिहासिक वारशाच्या जतनाला नवी दिशा मिळणार आहे दीर्घकाळापासून दुर्लक्षित अवस्थेत असलेल्या या समाधीबाबत स्थानिक नागरिक व इतिहासप्रेमींकडून वारंवार पाठपुरावा केला जात होता. या पार्श्वभूमीवर पुरंदर–हवेलीचे माजी आमदार तसेच भाजपचे पश्चिम महाराष्ट्र चिटणीस संजय जगताप यांनी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावला. दरम्यान, शासनाच्या प्राथमिक मान्यतेनंतर संबंधित विभागाकडून सविस्तर आराखडा तयार करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. आराखड्यास अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष जीर्णोद्धाराच्या कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. समाधी परिसराचे सुशोभीकरण, प्रकाशयोजना, माहिती फलक उभारणी तसेच पर्यटकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याचा समावेश या कामात असणार आहे. त्यामुळे सासवडसह पुरंदर परिसरातील ऐतिहासिक स्थळांना चालना मिळून पर्यटनवृद्धीलाही हातभार लागणार आहे.



सासवड येथे कऱ्हा–चांबळी संगमावर उभारण्यात येणाऱ्या श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या समाधीच्या जीर्णोद्धार व सुशोभीकरणाचा प्रस्तावित आराखडा (दृश्य)

# आळंदीत राम जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** श्री राम जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर येथील आवेकर–भावे रामचंद्र संस्थान ट्रस्टच्या राम मंदिरात दि.१९ मार्च ते २६ मार्च २०२६ या कालावधीत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांना भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दररोज सकाळी ७ ते ८ या वेळेत वेद पाठशाळा आळंदी यांच्या मार्फत रुद्र अभिषेकाचे मंत्रपठण करण्यात येत आहे. यासोबतच विविध कलाविष्कारांनी राम मंदिराचा परिसर भक्तिमय वातावरणाने भारून गेला आहे.

कार्यक्रमांतर्गत भरतनाट्यम नृत्य सादरीकरण डॉ.परिमल फडके यांच्या परिमल परफॉर्मिंग आर्ट अँड रिसर्च सेंटरच्या विद्यार्थ्यांनी केले. तसेच पं. रमाकांत पराजपे यांचे वाद्य



संगीत, ज्ञानेश्वरीताई रोकडे महाराज, रामकृष्ण गरड महाराज व मुक्ता कुलकर्णी गरसोळ यांची अभंग वाणी, सई देशपांडे यांची रामलीला, नितीन आवेकर यांचा रामनाम गजर, संजय भावे यांचे सेक्सोफोन वादन, अर्पणा केळकर यांचे अभंग सादरीकरण असे विविध कार्यक्रम रंगले. याशिवाय अमिता घुगरी व तुषार रिठे यांचे भक्ती संगीत, हेमंत आठवले यांचे भजन, अमित खरे यांचे बासरी वादन, ज्योती गोराणे यांचे अभंग–भक्तीगीत, आबा महाराज गोडसे यांचे वारकरी भजन तसेच विद्या इंगळे व रमा चोभे यांचे शास्त्रीय वायलिन वादन अशा विविध सादरीकरणांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.या सर्व कलाकारांचा सत्कार संस्थानचे मुख्य विश्वस्त राहुल आवेकर तसेच विश्वस्त अविनाश गुळुंजकर, अर्जुन मेदनकर, लक्ष्मीकांत दंडनाईक, चिन्मय चोभे, रमेश मुसुडगे व माजी विश्वस्त यांच्या हस्ते करण्यात आला. राम नवमीपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त मंडळाने केले आहे.

## रयत शिक्षण संस्थेच्या कवठे हायस्कूलची नवसंजीवनी

### आगीतून उभा राहिलेला आधुनिक प्रयोगशाळा व इमारतीचा नवा प्रवास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :-** रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, कवठे हायस्कूलच्या इतिहासातील २४ मार्च २०१६ हा दिवस अत्यंत वेदनादायक ठरला होता. या दिवशी शाळेची जुनी इमारत व प्रयोगशाळा भीषण आगीत पूर्णतः भस्मसात झाली होती. मात्र या घटनेला आज दहा वर्षे पूर्ण होत असताना, त्याच जागी उभी राहिलेली अद्ययावत व सुसज्ज इमारत ही जिद्द, एकजूट आणि विकासाची प्रेरणादायी कहाणी ठरली आहे.आगीच्या दुर्घटनेनंतर ग्रामस्थ, देणगीदार, माजी विद्यार्थी व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत शाळेच्या पुनर्बांधणीचा निर्धार केला. या सामूहिक प्रयत्नांतून आज अत्याधुनिक सुविधा असलेली नवीन इमारत व सुसज्ज प्रयोगशाळा विद्यार्थ्यांच्या सेवेत दाखल झाली आहे. विज्ञान शिक्षणाला चालना देणारी ही प्रयोगशाळा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी निर्माण करत आहे.या इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी कवठे गावचे रहिवासी असलेले व संस्थेचे विद्यमान मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रा. किसनराव रत्नपारखी यांचे विशेष मार्गदर्शन,सहकार्य लाभले. तसेच तत्कालीन मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, खेडचे माजी आमदार राम कांडगे तसेच संस्थेतील अनेक आजी–माजी सदस्य व पदाधिकाऱ्यांनी व शाळेच्या माजी विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांनी मोलाचे व भरीव योगदान दिले.



# मेसमधील फिल्टरच्या विजेच्या धक्क्याने विद्यार्थ्यांचा मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** येथील पुणे कृषी महाविद्यालयातील मेसमधील फिल्टरमुळे लागलेल्या विजेच्या तीव्र धक्क्यामुळे एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याचे दुर्दैवी घटना मंगळवारी (ता.२४) घडली. चैतन्य कुंडलिक चव्हाण (वय २३, रा. डोंगरगाव, ता. आष्टी, जि. बीड) असे विजेच्या धक्क्याने मृत्यू झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. १४ तारखेला रात्री ही घटना घडली असून त्यानंतर त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान मंगळवारी त्याची प्राणज्योत मालवली.

चैतन्य हा कृषी महाविद्यालयातील २०२१–२०२५ बॅचचा माजी विद्यार्थी होता. सध्या तो एग्रीकल्चर बिझनेस मॅनेजमेंटच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत होता. महाविद्यालयीन काळात तो 'ई मेस'चा कमिटी मेंबर म्हणून कार्यरत होता. मेसची व्यवस्था सुरळीत चालावी यासाठी तो नेहमी पुढाकार घेत.

**घडलेली घटना ही अत्यंत दुर्देवी आहे. निधन झालेल्या विद्यार्थ्यांचा हॉस्पिटलमधील झालेला जवळपास नऊ लाख रूपयांचा खर्च हा महाविद्यालयाने उचलला आहे. यामध्ये उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही मदत केली असून मुख्यमंत्री कार्यालयाकडूनही योग्य ती मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. घटनेबद्दल चौकशीसाठी समिती नेमली असून यापुढे अशा घटना घडू नये, यासाठी काळजी घेतली जाईल.**

**विलास खर्चे, कुलगुरू,**
**महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी,**

घटनेच्या दिवशीही मेसमधील फिल्टर तपासत असताना अचानक त्याला विजेचा तीव्र धक्का बसला. या अपघातात तो गंभीर जखमी झाला होता. त्याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांकडून त्याच्यावर उपचार सुरू होते, मात्र त्याची प्रकृती गंभीरच होती. दरम्यान याबाबत अद्याप कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही.

दोषींवर कारवाई व ऑडिटची मागणी : चैतन्य याचा मृत्यू झाल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून दोषींवर कठोर कारवाई आणि संपूर्ण व्यवस्थेचे तातडीने ऑडिट करण्याची मागणी करत विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले आहे. विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी नयन अडगोकर यांनी सांगितले की, मेसमधील फिल्टर आणि वीज व्यवस्थेबाबत आम्ही दरवर्षी नव्या कमिटीमार्फत प्रशासनाला सूचना देत आलो आहोत. तरीही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. धक्कादायक बाब म्हणजे, आजही काही ठिकाणी करंट लागत असल्याच्या तक्रारी आहेत.या घटनेनंतर महाविद्यालय प्रशासनाने जखमी चैतन्यच्या उपचारासाठी रुग्णालयाचा खर्च उचलला होता. मात्र, विद्यार्थ्यांच्या मते केवळ आर्थिक मदत पुरेशी नसून, जबाबदारांवर ठोस कारवाई होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबरोबरच मेसमधील सर्व विद्युत यंत्रणेचे तांत्रिक ऑडिट करण्याची मागणी केली आहे. चौकशी झाली असल्याचे सांगितले जात आहे, मात्र प्रत्यक्षात निष्कर्ष आणि कारवाई स्पष्ट व्हावी, अशीही मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. या आंदोलनामुळे महाविद्यालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करण्याचा इशारा दिला आहे.

## थोरांदळे शाळेत सांस्कृतिक कला महोत्सव संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा थोरांदळे येथे सांस्कृतिक कला महोत्सव संपन्न झाला.महोत्सवाचे उद्घाटन आय. आय.टी. इंजिनियर्स व मल्टिनॅशनल कंपनीच्या मॅनेजर श्वेताताई शेखर विश्वासराव यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी शाळेतील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या विविध कला व नृत्य सादर केले.सदर कलाविष्काराला ग्रामस्थांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला यावेळी गावातील इंजिनिअरिंग क्षेत्रात काम करणाऱ्या सुमारे ३६ इंजिनीअर्स भूमिपुत्रांचा तसेच बँकिंग क्षेत्रात काम करणारे सुमारे १५ बँक कर्मचारी व अधिकारी भूमिपुत्रांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी आंबेगाव तालुका पंचायत समितीचे सभापती कैलास काळे, उपसभापती ज्योती पारधी, जिल्हा परिषद सदस्या प्रीती थोरात, पंचायत समिती सदस्या प्रियांका वाघ, गावचे सरपंच जे डी. टेमगिरे, उपसरपंच संदीप टेमगिरे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, चांडोली केंद्राच्या केंद्रप्रमुख सीमा कहडणे, मुख्याध्यापक हेमराज भदाणे तसेच गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. सदर कार्यक्रमासाठी गावातील नोकरदार वर्ग, तरुण मंडळ व ग्रामस्थ यांच्याकडून आर्थिक योगदान लाभले. कार्यक्रमाचे संपूर्ण व्यवस्था शालेय व्यस्थापन समिती अध्यक्ष दिनेश टेमगिरे, उपाध्यक्ष सागर विश्वासराव, सदस्य सचिन टेमगिरे, मनोहर पोखरकर, अभिजित टेमगिरे, देवराम घुले, रामदास मिंडे, पोपट टेमगिरे, सोनाली भोर, नयन तोत्रे व शाळेतील सर्व शिक्षकांनी पाहिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब कानडे, सूत्रसंचालन विजय डोके, शैला थोरात, श्वेता चिखले, कमल थोरात यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन विनायक पडवळ, संदीप शिंदे, अनिकेत आवटे यांनी केले. आभार मिलिंद चिखले यांनी मानले.

# धामणी सिंचन योजनेला मिळणार वीज शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** धामणी (ता.आंबेगाव ) येथील शेतकर्यांच्या उपसा सिंचन योजनेला वीजजोड देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानूसार पुणे येथील महावितरणचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी सोमवार (दि.२३) रोजी जारकरवाडी ( ता. आंबेगाव ) हद्दीतील

> दोन दिवसांपूर्वी माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांची धामणी ग्रामस्थांनी भेट घेतली होती वळसे पाटील यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून सूचना देत घटनास्थळाला भेट देण्यास सांगितले होते संबंधित प्रशासनाने वळसे पाटील यांच्या सूचनेची दखल घेत पहाणी सुरू केली आहे
> रवींद्र करंजखेले – माजी पंचायत समिती सदस्य आंबेगाव.

ज्ञानेश्वरवस्ती येथे डिंभा धरणाऱ्या उजव्या कालव्यावर असणार्णा सोलर प्रकल्पाची प्रत्यक्ष पहाणी केली असून या पहाणीचा अहवाल मुख्यमंत्री यांना लवकरात लवकर सादर केला जाणार आहे.त्यामुळे या धामणी सिंचन योजनेमध्ये असणार्या शेतकर्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. या पहाणीत महावितरणचे मुख्य



अभियंता सुनिल काकडे,अधिक्षक अभियंता युवराज जरग, मंचर येथील कार्यकारी अभियंता राहुल गवारी,उपकार्यकारी अभियंता पुनम पांडकर,लोणी येथील कनिष्ठ अभियंता हितेश गायकवाड,सहाय्यक अभियंता नितेश बसारकर आणि लाईनमन व योजनेतील सर्व शेतकरी उपस्थित होते अशी माहिती धामणी ग्रामपंचायत सदस्य प्रतीक जाधव यांनी दिली यावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य रवींद्र करंजखेले, खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष अनिल वाळुंज, उद्योजक मंगेश नवले, वामनराव जाधव, कैलास रोडे, बाळासाहेब विधाटे,या योजनेचा संबंधित शेतकरी यावेळी उपस्थित होते

ामणी हे दुष्काळग्रस्त गाव असून येथील शेतकर्यांनी कोट्यावधी रुपये खर्च करून उजव्या कालव्यावरून नऊ सामुदायिक उपसा सिंचन योजना सुरू केल्या आहेत.मात्र नवीन वीजजोड नसल्याने या योजना सौर प्रकल्पावर पूर्ण क्षमतेने चालत नाही .त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहेत.या सिंचन योजनेला वीज जोड मिळावा यासाठी धामणी येथे ३०० शेतकरी ग्रामस्थांनी एक दिवसीय उपोषण करून शासनाचे लक्ष वेधले होते. दरम्यान महावितरणचे मुख्य अभियंता

सुनिल काकडे यांनी येथे भेट देऊन येथे असलेल्या सोलर प्रकल्पाची पहाणी केली व दूर अंतरावर असलेल विहिरीवर जाऊन पहाणी केली. आता या योजनेला नक्कीच वीजजोड मिळेल अशी आशा येथील शेतकर्यांनी व्यक्त केली.व आपण आपल्या हक्काच्या पाण्यासाठी दिलेल्या लढ्याला यश येणार असल्याने आनंद व्यक्त केला.

## पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा पुणे ग्रामीणची धडाकेबाज कारवाई

### तीन मोटार सायकल, घरफोडी उघड; करत एकुण १ लाख ६५ हजार मुद्देमाल हस्तगत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर -** वडगाव निंबाळकर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखा पुणे ग्रामीण यांची धडाकेबाज कारवाई घरफोडी व चोरीचे गुन्हयातील आरोपीस निष्पन्न करून तीन मोटार सायकलचे गुन्हे व एक घरफोडी उघड करून त्याचे कडुन एकुन १,६५,५०० रू.कि. चा मुददेमाल हस्तगत मिळालेल्या माहितीनुसार बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन हददीतील मौजे को-हाळे बु।। ता. बारामती जि. पुणे गावचे हददीतील कटीण पुल येथुन फिर्यादीची लाल रंगाची मोटार सायकल नं. एम.एच ४२ ए.पी ९४९६ ही चोरीस गेलेबाबत फिर्यादीने वडगांव निंबाळकर पोलीस स्टेशन गु.रजि. नं. ५२/२०२६ बी.एन.एस कलम ३०३(२) प्रमाणे दाखल झाल्याचे अनुशंगाने प्रभारी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशनन हद्दीत पेट्रोलींग करीत असताना आम्हाला एक संशयीत इसम मोटार सायकल नंबर नसलेली हि संशयीतरित्या चालवित असताना मिळुन आला असता त्याचेकडे वरील मोटार सायकल बाबत




अधिक विचारपुस केली असता त्याने त्याचा मित्र मयुर भोसले रा. इंदापुर जि.पुणे याचे बरोबर मयुरचे दोन मित्र असे मिळुन त्यांनी १) कठीणपुल को-हाळे बु।। या ठिकाणावरून एक होंन्डा कंपणीची युनिकॉनर मोटर सायकल चोरून आणल्याचे सागितले तसेच २) फलटण ग्रामीण होळ गावातुन एक होंन्डा कंपणीची युनिकॉनर मोटर सायकल चोरून आणल्याचे सागितले ३) लोणंद येथुन हिरो कंपणीची स्पिलेन्डर मोटर साकयल चोरून आणलेचे सागितले आहे. त्या तिन्ही मोटर सायकल हया को-हाळे खुर्द होळ रोड लगत पुलाच्या जवळ काटवानामध्ये लपवुन ठेवल्या आहेत. तसेच वडगाव गावातील होळ या ठिकाणी त्याचा मित्र मयुर नितीन भोसले राहणार कालठण नंबर १ ता. इंदापुर जि. पुणे. व मयुर याचे दोन अनोळखी मित्र असे याने बंद घरफोडल्याचे सागितले आहे. त्या बाबत खालील प्रमाणे संबधित पोलीस स्टेशनला खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

विधीसंघर्षीत बालक याने व त्याचे साथीदार १) मयुर नितीन भोसले राहणार कालठण नंबर १ इंदापुर जि.पुणे. व दोन अनोळखी इसम यांनी खालील ४ गुन्हे केले आहेत. त्याचेकडुन इतर चोरीचे व घरफोडीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे त्याचा तपास चालु आहे. ४ गुन्हयात मिळुन चोरीस व घरफोडीत गेलेला असा एकुन १ लाख ६५ हजार ५००/– रू मुददेमाल गुन्हयाचे कामी जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी ही संदीप सिंह गिल सो, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, गणेश बिरादार सो. अपर पोलीस अधीक्षक, बारामती विभाग,सुदर्शन राठोड सो. उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती उपविभाग, प्रमोद क्षीरसागर पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक नागनाथ पाटील, स्था. गुन्हे शाखा सपोनि कुलदीप संकपाळ, सहा. फौ. बाळासाहेब कारंडे पो हवा अभिजीत एकशिंगे, स्वप्नील अहिवळे, वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार पोपट नाळे, भाउसाो मारकड, सागर चौधरी, महेश पन्हाळे, आबा जाधव, सुरज धोत्रे, धनंजय भोसले, नरेद्र यादव यांनी केलेली आहे. सदर गुन्हयांचा पुढील तपास चालु आहे.

# पाच महत्त्वाच्या निवेदनांद्वारे विविध प्रश्नांवर ठोस पाठपुरावा

# खा. नीलेश लंके यांनी घेतली संरक्षण मंत्र्यांची भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर** : खासदार नीलेश लंके यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन मतदारसंघाशी संबंधित विविध महत्त्वाच्या व प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी एकूण पाच निवेदने सादर करत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

खासदार लंके यांनी माजी सैनिकांना

माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजनेअंतर्गत (ईसीएचएस) मिळणाऱ्या आरोग्य सुविधांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केला. अहिल्यानगर येथील माजी सैनिक संतोष जगन्नाथ पिसे यांना डायलिसिससारख्या अत्यावश्यक उपचारासाठी संबंधित रुग्णालयाने ईसीएचएस अंतर्गत सेवा देण्यास नकार दिल्याची बाब त्यांनी मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. या प्रकारामुळे संबंधित रुग्णाच्या जीवाला धोका निर्माण झाला असून, अशा समस्या इतर माजी सैनिकांनाही भेडसावत असल्याचे त्यांनी नमूद केले. याबाबत तात्काळ योग्य त्या सूचनांचे आदेश देण्याची मागणी करण्यात आली.



तसेच, मृत सैनिक योगेश बापूराव शिर्के यांच्या पत्नीच्या प्रकरणात सहानुभूतीपूर्वक विचार करून तिला पेन्शनरी लाभ देणे अथवा शासकीय सेवेत पुनर्वसन करण्याची मागणी लंके यांनी केली. संबंधित विधवा आपल्या अल्पवयीन मुलासह अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगत असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय, अहिल्यानगर व राहुरी तालुक्यातील सैन्य क्षेत्रालगतच्या गावांमध्ये बांधकामासाठी अन-आपत्ती प्रमाणपत्र संदर्भातील परिपत्रकांमधील विरोधाभासामुळे निर्माण झालेल्या गोंधळाचा मुद्दा त्यांनी मांडला. २०११ व २०१६ मधील परस्परविरोधी आदेशांमुळे स्थानिक प्रशासन व सैन्य अधिकाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून, त्याचा फटका नागरिकांना बसत आहे. या पार्श्वभूमीवर एकसंध, स्पष्ट आणि अद्ययावत मार्गदर्शक तत्त्वे तातडीने जारी करण्याची मागणी करण्यात आली. स्थानिक शेतकरी व नागरिकांच्या मालकी हक्कांवर या निर्बंधांचा परिणाम होत असल्याचे निदर्शनास आणून देत, त्यांच्या वैध हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी मागणीही लंके यांनी केली. तसेच प्रशासन, सैन्य यंत्रणा आणि नागरिक यांच्यात समन्वय साधण्यासाठी पारदर्शक कार्यप्रणाली विकसित करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यासोबतच, अहमदनगर स्टेशन मुख्यालयाच्या अखत्यारित येणाऱ्या कपूरवाडी तलावात साचलेला गाळ काढण्याची मागणी करण्यात आली. या तलावातील गाळामुळे जलसाठा कमी झाला असून, तो काढल्यास परिसरातील शेती व पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर मोठा दिलासा मिळू शकतो, असे लंके यांनी स्पष्ट केले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी खासदार लंके यांनी मांडलेल्या सर्व मुद्द्यांची गांभीर्याने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. या भेटीमुळे अहिल्यानगर (दक्षिण) मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, खा. लंके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे सर्व स्तरांतून स्वागत केले जात आहे.

## द•ख•ल

### ‘आनंदऋषीजीं’च्या स्मृतिदिनानिमित्त चिचोंडीतून भव्य पायी दिंडी सोहळा

**शिराळ चिचोंडी** : पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी शिराळ येथील जन्मभूमी आचार्य सम्राट राष्ट्रसंत परमपूज्य श्री आनंद ऋषीजी महाराज साहेब यांच्या ३३ व्या पुण्य स्मृतीदिनानिमित्त चिचोंडी येथून सकाळी सात वाजता जैन स्थानक चिचोंडी पायी दिंडी सोहळ्याचे उद्धघाटन समारोह श्री वर्धमान स्थानक वाशी जैन श्रावक संघ चिचोंडी श्री आनंद विद्यालय चिचोंडी व चिचोंडी ग्रामपंचायत यांच्या मार्गदर्शनाखाली २७ मार्च रोजी सकाळी सात वाजता दिंडी प्रारंभ होणार आहे दिंडी चिचोंडी कोल्हार बहिरवाडी मार्गे दुपारी एक वाजता शिकारे वस्ती टोल नाका जेऊर येथे भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे त्यानंतर पाच वाजता सुरज पेट्रोल पंप गजराज नगर येथे दिंडीसाठी नाष्टा संध्याकाळी सात वाजता चेतना लॉन्स अहिल्यानगर येथे दिंडीचा मुक्काम व भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. २८ मार्च रोजी सकाळी सहा वाजता चेतना लॉन्स येथून सात वाजता नवी पेठ चेंज स्थानक येथे आगमन आठ वाजता धार्मिक परीक्षा बोर्डाकडे प्रयान नऊ वाजता धार्मिक परीक्षा बोर्ड अहिल्यानगर येथे स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे तरी आनंद भक्तांनी २७ मार्च रोजी सकाळी सात वाजता जैन स्थानक चिचोंडी येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान वर्धमान स्थानक वाशी जैन श्रावक संघ चिचोंडी व आनंद भक्त गण चिचोंडी यांनी केले आहे.

### निसर्गात ऊर्जा निर्माण करणारी खरी ताकद : वनपरिक्षेत्र अधिकारी जगताप



**लिंपणगाव** : आपण दैनंदिन जीवन जगतांना आपणास अनेक चिंताना सामोरे जावे लागते.परंतु निसर्गाच्या सानिध्यात आल्यानंतर मन प्रसन्न होवून मनाला नवी उर्जा मिळते. हिच खरी ताकद निसर्गात आहे. परंतु आपणांस त्याचे महत्व समजत नाही. म्हणून आपण प्रत्येकांने निसर्गाचा दूत होवून काम केले तर चांगले आरोग्य लाभेल असे आव्हान श्रीगोंद्याच्या सामाजिक वनीकरण विभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी पल्लवी जगताप-उंडे यांनी बोलताना केले आहे. श्रीगोंदा तालुक्यातील सोनुबाई सखाराम महाजन शेतकी प्रशाला मांडवगण येथे विभागीय वन अधिकारी अमोल जाधव, सहाय्यक वनरक्षक सोनल केसरकर,सामाजिक वनीकरण यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयात जागतिक चिमणी दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एन.के.रसाळ होते.

### सोनमाळी कन्या विद्यामंदिराच्या विद्यार्थीनीचे यश

**कर्जत :** रयत प्रज्ञा शोध आणि रयत ऑलिम्पियाड परीक्षेत कर्जतच्या सोनमाळी कन्या विद्यामंदिराच्या विद्यार्थीनीनी उत्तम यश मिळवले. या गुणवत्ताधारक पाच ही विद्यार्थीनीचा विद्यालयाच्यावतीने सन्मान करण्यात आला. सो. ना. सोनमाळी कन्या विद्यामंदिर कर्जतने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची मोहोर उमटवत शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्रतिष्ठेची मानली जाणारी रयत प्रज्ञाशोध परीक्षेत प्रणिती प्रदीप कोकाटे हिने १४४ तर शर्वरी रवींद्र नरसाळे हिने १४२ गुण मिळवत मुलाखतीसाठी पात्र ठरले. यासह रयत ऑलिम्पियाड परीक्षेमध्ये अनुष्का संदीप काकडे (८६ गुण), पायल अतुल सोनमाळी (८५ गुण) आणि सानिका बिभिषण जेवे (८१ गुण) यांनी उत्तुंग यश प्राप्त करीत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

# पोखरी येथील हजरत गंजपीर वली शहा दर्गा ऊरुसाला आजपासून प्रारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर** : पारनेर तालुक्यातील पोखरी येथील पवळदरा परिसरात असलेल्या हजरत गंजपीर वली शहा दर्गा येथे वार्षिक ऊरुसानिमित्त विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, २६ मार्च ते शनिवार, २८ मार्च २०२६ या कालावधीत हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार असून, परिसरातील भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

या उत्सवाचा प्रारंभ गुरुवार, २६ मार्च रोजी संध्याकाळी सात वाजता पारंपारिक संदलच्या कार्यक्रमाने होणार आहे. त्यानंतर शुक्रवार, २७ मार्च रोजी मुख्य सोहळा रंगणार असून, संध्याकाळी सात ते अकरा या वेळेत भव्य छबिना मिरवणूक काढण्यात येईल. या प्रसंगी चित्तथरारक आतिषबाजी आणि शोभेच्या विद्युत रोषणाईचे विशेष आकर्षण असणार आहे. रात्रीच्या सत्रात रसिक प्रेक्षकांसाठी आनंद महाजन यांचा लोकनाट्य तमाशा आयोजित करण्यात आला आहे. ऊरुसाची सांगता शनिवार, २८ मार्च रोजी संध्याकाळी चार ते सात या वेळेत होणाऱ्या जंगी कुस्त्यांच्या हगाम्याने होईल. या कुस्त्यांच्या मैदानात नामांकित पैलवान आपली चुणूक दाखवणार आहेत.

या सर्व धार्मिक, सांस्कृतिक आणि क्रीडाविषयक कार्यक्रमांना पोखरी, पवळदरा व चंदनटेक परिसरातील ग्रामस्थांनी तसेच कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ऊरुसाची शोभा वाढवावी, असे आवाहन समस्त ग्रामस्थ पोखरी पवळदरा व चंदनटेक यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी ग्रामस्थांकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे.

# घोटणच्या कालिका देवीचा आज यात्रोत्सव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिराळ चिचोंडी** : शेवगाव तालुक्यातील घोटण येथील क्षेत्रीय कासार समाजाचे कुलदैवत श्री कालिका देवचा यात्रा उत्सव आज दिनांक २६ १२ पासून सुरू होत असल्याची माहिती संस्थांचे अध्यक्ष शिवाजी गोसावी यांनी दिली.

रामनवमी निमित्त सुरू होत असलेल्या यात्रेमध्ये आज सकाळी पैठण वरून आणलेल्या कावडीची मिरवणूक शेवगाव ते घोटण पायी दिंडी बालमटाकळी ते घोटण पायी दिंडी पैठण ते घोटण पायी दिंडी या दिंडीचे आगमन व पूजा सप्तशती पाठ, देवीचा अभिषेक आरती होईल

दुपारी प्रमुख पाहुण्याच्या हस्ते अभिषेक, तीन वाजता श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र शेवगाव व पाथर्डी येथील शेवेकरांचे सप्तशती पाठ, आरती व देवीला नैवेद्य अर्पण करण्यात येईल

संध्याकाळी सात वाजता



आराधना रात्री नऊ वाजता राम नवमी व श्री कालिकामाता प्रगट दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे

शुक्रवारी सकाळी अभिषेक दुपारी अहिल्यानगर येथील महिला भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम होईल तसेच दुपारी तीन वाजता संस्थांची बैठक व मान्यवरांचा सत्कार , संध्याकाळी सहा वाजता ग्रामदैवत मसोबाची पूजा,

संध्याकाळी सात वाजता सामुदायिक महाआरती होईल त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होईल रात्री नऊ वाजता कुलदेवतेची गावातून पालखी मिरवणूक काढण्यात येईल मिरवणुकीत दिवट्या झांजपथक बँड शोभेची दारूची आतिषबाजी आराधी ढोलीबाजा सहभागी होणार आहे

पहाटे मंदिरात प्रदक्षिणा घालून दोन दिवशी यात्रेची सांगता होईल परिसरातील तसेच जिल्ह्यातील भाविकांनी यात्रेचा लाभ घ्यावा अशी आव्हान संस्थांचे सचिव अशोक पाथरकर अनिल गोसावी, रवी शेठ पाथरकर, अभय थिटे, विकास शेठ सातपुते, रमेश शेठ रासने, कैलास गोसावी, रमेश काळे, राजेंद्र गोसावी, सुनील रासने किरण गोसावी प्रकाश रासने अरुण रासने सोमनाथ रासने सौ मंगल काळे पत्रकार रमेश पाथरकर आदींनी केले आहे

# कौशल्ये विकसित करून आदर्श व्यक्ती व्हा : शिंदे




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :** शिक्षणाच्या पदवी प्राप्त केल्यानंतर तुम्ही जीवनात यशस्वी होऊ शकता परंतु प्रत्येक विद्यार्थ्याच्या अंगी अनेक सुप्त गुण, कला व कौशल्य असते,त्या कलेच्या माध्यमातून तुम्ही तुमचं भविष्य उज्ज्वल करू शकता यांसारख्या अनेक कौशल्ये विकसित करून तुम्ही तुमचं भविष्य निर्माण करून तुम्ही एक आदर्श व्यक्ती होऊ शकता. असे प्रतिपादन ऋषिकेश शिंदे यांनी बोलताना व्यक्त केले.

शेवगांव तालुक्यातील आव्हाणे बु येथील श्री गजानन माध्य व उच्च माध्य विद्यालयात ग्रामपंचायतीच्या वतीने मुख्यमंत्री पंचायतराज अभियान अंतर्गत नाविण्यपूर्ण उपक्रमा अंतर्गत विद्यालयात कौशल्य विकास प्रशिक्षण २०२५-२६ आयोजित करण्यात करण्यात होते. आला. त्यावेळी शिंदे बोलत होते.यावेळी संजय कोळगे ,बबन भुसारी ,अंबादास कळमकर,सुधाकर चोथे,सौ.जयश्री फलके, सौ.कोमल वाघ , विद्यालयाचे प्राचार्य रमेश लांडे , शेषराव आव्हाड आदी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सौ.जयश्री फलके म्हणाल्या की मुलींनी शिक्षणाबरोबरच ब्युटी पार्लर यांसारख्या अनेक कोर्सेस च्या माध्यमातून तुम्ही तुमचं भविष्य या व्यवसायाच्या माध्यमातून तुम्ही तुम्ही तुमचं कौटुंबिक जीवन परिपूर्ण करु शकता. तसेच सौ. कोमल वाघ यांनी विद्यार्थ्यांनींना मार्गदर्शन करताना ब्युटी पार्लर, मेहंदी, शिवणकाम,विणकाम, भरतकाम, यांसारख्या अनेक कौशल्याच्या माध्यमातून तुम्ही तुमचं कौटुंबिक जीवन परिपूर्ण करु शकता आणि तुमचं भविष्य उज्ज्वल करू शकता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जाधव के. के.यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा.योगेश नरवडे सर यांनी मानले.

दरम्यान, आजच्या या धावपळीच्या युगात विज्ञानाने केलेली प्रगती, औद्योगिक क्रांती यामध्ये जग पुढे चाललं आहे.पण या सर्वांबरोबर माझी वसुंधरा च्या माध्यमातून तुम्ही प्रत्येक व्यक्तीने फळ झाडे तसेच विविध प्रकारच्या झाडांची लागवड करुन तुम्ही त्या झाडांचे संगोपन करुन वसुंधरेच संरक्षण केले तर पर्यावरण संतुलित करु शकता.तसेच तुम्हाला तुमचं भविष्य घडवण्याबरोबर सृष्टीचे,या वसुंधरेच संरक्षण करणं हि एक काळाची गरज आहे .

# कनिष्ठ अभियंत्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप

# सर्व संपत्तीची विभागीय चौकशी व्हावी; अन्यथा उपोषण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : जिल्हा परिषद, अहिल्यानगर सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता यांच्यावर बिले मंजूर करताना अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहे. नुकतेच लाच घेताना गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांच्या कामांची सखोल चौकशी करून शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे.



या संदर्भातील निवेदन समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी नाशिक विभागीय आयुक्त तसेच जिल्हा परिषद प्रशासनाला दिले आहे.

निवेदनात म्हंटले आहे की, सार्वजनिक बांधकाम उपविभागातील कनिष्ठ अभियंता तथा अतिरिक्त पदभार उपअभियंता म्हणून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याने दि. २३ मार्च रोजी मौजे देहरे येथील दत्त मंदिर स्मशानभूमी सुशोभीकरणाच्या ८ लाख २२ हजार २०६ रुपयांच्या कामाचे बिल मंजूर केले. या बिलाच्या मंजुरीसाठी त्यांनी संबंधित ठेकेदार यांच्याकडे एकूण रकमेच्या २ टक्के, म्हणजेच सुमारे १६ हजार रुपयांची मागणी केल्याप्रकरणी लास्ट लुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांच्यावर नुकताच गुन्हा दाखल केला आहे.

तसेच संबंधित कामामध्ये काही त्रुटी असतानाही जाणीवपूर्वक बिल मंजुरीसाठी विलंब करण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, अनेक गावांमधील कामांमध्ये त्रुटी असतानाही बिले मंजूर करण्यात आली असून, शासनाच्या नियमांची पायमल्ली करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक लाभ गोळा केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

महाराष्ट्रशासनाच्या नियमांनुसार शासकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या मालमत्तेची माहिती शासनाकडे सादर करणे बंधनकारक असताना, सदर अधिकाऱ्याने मालमत्ता, खरेदी किंवा गुंतवणुकीबाबत आवश्यक माहिती सादर केली नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

यामुळे त्यांनी मंजूर केलेल्या सर्व कामांची शासन परिपत्रकानुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून विभागीय स्तरावर सखोल चौकशी करावी. तसेच त्यांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या मालमत्तेची उघड तपासणी करून दोषी आढळल्यास त्यांना कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, अशी मागणी समितीने केली आहे.

दरम्यान, येत्या एका महिन्यात यासंदर्भात ठोस कारवाई न झाल्यास अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाबासाहेब मुदगल

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी बाबासाहेब मुदगल तर व्हाईस चेअरमन पदी कैलास चावरे यांची एकमताने निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेचे कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी ज्योतीताई हराळे यांनी पाहिले.

चेअरमन पदासाठी बाबासाहेब मुदगल यांच्या नावाची सूचना संचालक सोमनाथ सोनवणे यांनी मांडली तर अनुमोदन संचालिका प्रमिलाताई पवार यांनी दिले. त्याचप्रमाणे व्हाईस चेअरमन पदासाठी कैलास चावरे यांच्या नावाची सूचना संचालक बलराज गायकवाड यांनी केली तर अनुमोदन संचालक अजय कांबळे यांनी दिले.या प्रसंगी तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, माजी चेअरमन विजय कोतकर, माजी व्हॉइस चेअरमन किशोर कानडे, संचालक सतीश ताठे, विकास गीते, गुलाब गाडे, शेखर देशपांडे, बाळासाहेब गंगेकर, बाळासाहेब पवार, कार्यलक्ष्मी संचालक आनंद तिवारी आदींसह कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानाचा दीप तेवत ठेवणारा सोहळा...

# खामकर वस्ती शाळेचा रौप्य महोत्सव दिमाखात साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खामकर वस्ती येथे काल रात्री २५ व्या रौप्य महोत्सवानिमित्त वार्षिक स्नेहसंमेलन व सांस्कृतिक कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. त्यावेळी बालकलाकारांनी सर्वांची मने जिंकल्याने सगळीकडे कौतुकाचा वर्षाव होताना दिसत होता.

कार्यक्रमाला टाकळी कडेवळीत येथील श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हा चेरमन,ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, तसेच सहकार सोसायटीचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ ,पत्रकार आणि गावातील महिला भगिनी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शैक्षणिक क्षेत्रातील शिक्षकवृंद व अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली एकदम फुल हाऊस कार्यक्रम पाहण्यास मिळाला या कार्यक्रमात संस्कृती ,शिक्षण यांचा परफेक्ट कॉम्बो पाहण्यास मिळाला विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी



उपस्थितांची मनं जिंकली. गाणी, नृत्य, नाटिका सगळंच एकदम टॉप क्लास! झाल्याने सर्वांची मने जिंकली त्यातून अनेकांनी शाळेसाठी मदतीचा हात देत तब्बल ८१ हजारांचा निधी जमा झाले आहेत कार्यक्रमादरम्यान शाळेच्या विकासासाठी ग्रामस्थांनी उत्स्फुर्तपणे प्रतिसाद देत तब्बल छ८१,००० इतकी देणगी जमा केली. गाव करील ते राव काय करील याचं जिवंत उदाहरणच म्हणावं लागेल! आणि हे प्रत्यक्षात पाहण्यास मिळाले मात्र या कार्यक्रमाच्या खऱ्या हिरोईन शिक्षकांचा सन्मान करण्यात आल्या या यशस्वी कार्यक्रमामागे सौ. भोईटे मॅडम आणि कविता भुजबळ मॅडम यांचे विशेष परिश्रम आहेत. त्यांनी केवळ कार्यक्रमच नव्हे, तर शाळेचा पट वाढवणे, शिक्षणाचा दर्जा उंचावणे आणि विद्यार्थ्यांना घडवण्याचे मोलाचे कार्य केले आहे.शाळा व्यवस्थापन समिती व समस्त ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

### अनोखे समीकरण साधले

यामध्ये गावकऱ्यांनी दाखवून दिले की गाव अधिक शाळा आणि शिक्षक अधिक पालक एकूण मजबूत भविष्य हीच खरी ग्रामीण शिक्षणाची स्टार्टअप स्टोरी आहे, जी पुढच्या पिढीला दिशा देणारी ठरतेय. एकंदरीत, हा कार्यक्रम फक्त स्नेहसंमेलन नव्हता तो गावाच्या एकजुटीचा, शिक्षणप्रेमाचा आणि उज्ज्वल भविष्यासाठीच्या बांधिलकीचा उत्सव होता.असेही खुलेआम बोलले जात होते

## जाहीर नोटीस

कोल्हार ग्रामपंचायत कोल्हार तालुका पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर या ग्रामपंचायत मध्ये मृत्यूची नोंद होणे बाबत...

तमाम लोकाश या जाहीर नोटीसाने कळविण्यात येते की कै तुकाराम यादव डमाळे राहणार कोल्हार तालुका पाथर्डी जिल्हा आईला नगर येथे दिनांक ८/७/२००७ रोजी मृत्यू झालेला आहे परंतु नजरचुकीने ग्रामपंचायत मध्ये नोंद झालेले नाही तरी कोलार ग्रामपंचायत कार्यालयास नोंद करण्यास यावी दिनांक २६/३/२०२६ रोजी प्रसिद्धीत देत आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
गुरुवार, दि.२६ मार्च २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## केसमध्ये नाव टाकले म्हणून तरुणाच्या डोक्यात कोयता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : आमचे नाव केसमध्ये टाकले याचा राग येवून श्रीरामपूर तालुक्यातील अशोकनगर फाटा येथे राहणारा व ११ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या डोक्यात कोयता मारून त्याला जखमी केले. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील अशोकनगर फाटा येथे राहणारा सनी याचे आजोबाचे एकाशी भांडण झाले होते. त्यावरून आजोबांनी संबंधितांविरोधात पोलिसात फिर्याद दिली होती. दोन दिवसांपूर्वी आजोबा हे साखर कामगार रूग्णालयात दाखल केलेले असताना त्यांना कपडे आणायला सनी घरी गेला असता शेजारी राहणारा सोमनाथ याने घरासमोरून जात असताना शिवीगाळ करत तू आमचे नाव केसमध्ये टाकले, तुला बघून घेऊ, तू आमच्या नादी लागू नको, असे म्हणत हातातील कोयत्याने सनीवर वार केला. त्यामुळे डोक्यातून रक्तस्त्राव येवून तो जखमी झाला. त्यानंतर तेथून सोमनाथ हा निघून गेला. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात सनी नावाच्या मुलाने फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी अशोकनगर फाटा येथे राहणाऱ्या सोमनाथ (पूर्ण नाव माहीत नाही) या इसमाविरूद्ध श्रीरामपूर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वैजापुरात पेट्रोल टंचाईची अफवा
### सकाळपासूनच पंपावर वाहनांच्या रांगा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : वैजापूर शहरातील पेट्रोल पंपावर बुधवारी सकाळपासूनच पेट्रोल भरून घेण्यासाठी वाहनधारकांनी रांगा लावल्याचे चित्र बघायला मिळाले. शिर्डी, श्रीरामपूर येथे पेट्रोल संपल्याने वैजापूर येथेही पेट्रोल मिळणार नाही अशी अफवा पसरल्याने मागील काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पेट्रोलची खरेदी झाली व त्यानंतर टप्प्याटप्प्याने शहरातील पेट्रोल पंपावरील साठा संपत आला. परिणामी बुधवारपासून तर पंपावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे गरज नसतांना ग्राहकांनी उगीचच मोठ्या प्रमाणावर पेट्रोल खरेदी करू नये, पेट्रोलचा साठा उपलब्ध आहे असे आवाहन पेट्रोल पंप चालकांनी केले आहे.



वैजापूर शहरात हिंदुस्थान पेट्रोलियम, इंडियन ऑइल (आयओसी) व भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) या कंपन्यांचे प्रत्येकी दोन तसेच नायरा व रिलायन्सचा प्रत्येकी एक असे सात पेट्रोल पंप आहेत. या सर्व पंपावर मुबलक प्रमाणावर पेट्रोल साठा होता. मात्र, खरेदी वाढल्यामुळे यातील काही पंपावरील साठा संपला. त्यामुळे वाहन धारकांनी आपला मोर्चा दुसऱ्या पंपावर वळवत खरेदी केली. त्यामुळे क्रमांक्रमाने पंपावरील पेट्रोल संपले.

> अचानक पेट्रोल संपल्याची अफवा झाल्याने तसेच शेजारच्या शिर्डी, श्रीरामपूर येथे पेट्रोल शिल्लक न राहिल्याने वाहचालकांनी पेट्रोल पंपावर गर्दी केली. त्यामुळे काही पेट्रोल पंपावरील साठा संपला होता. मात्र, काही दिवसातच पेट्रोल स्टॉक उपलब्ध झाल्यानंतर परिस्थिती सुधारेल
> **अनंत बोडखे, अध्यक्ष, पेट्रोल, डिझेल संघटना वैजापूर**

त्यातच अफवेची भर पडल्याने वाहनांची पेट्रोल पंपावर एकच गर्दी झाली. तथापि पुढील काही दिवसातच पेट्रोलचा स्टॉक आल्यानंतर पुरवठा सुरळीत होईल अशी अपेक्षा आहे.

## नेवासेत भव्य शोभायात्रा
### 'जय श्रीराम'च्या जयघोषाने शहर दुमदुमले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : रामनवमी उत्सवाच्या पूर्वसंध्येला बुधवारी (दि. २५ मार्च) नेवासा शहरात श्रीरामराज्य उत्सव समितीच्या वतीने हजारो रामभक्तांच्या उपस्थितीत भव्य शोभायात्रा मिरवणूक काढण्यात आली. जय श्रीराम, सियावर रामचंद्र की जय या घोषणांनी संपूर्ण नेवासेनगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली.



एस.टी. स्टँडजवळील श्री मळगंगा देवी मंदिरापासून शोभायात्रेला प्रारंभ झाला. श्रीरामचंद्रांच्या भव्य मूर्तीचे संतांच्या हस्ते पूजन करून सामूहिक हनुमान चालिसा पठणाने मिरवणुकीचा शुभारंभ झाला. मिरवणुकीत आकर्षक पुष्पसजावटीत रथावर विराजमान श्रीरामांची मूर्ती भाविकांचे विशेष आकर्षण ठरली. मिरवणुकीत विविध धार्मिक देखावे, जनजागृतीपर संदेश आणि भगवे ध्वज घेऊन युवकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. महिलांसाठी विशेष व्यवस्था केल्याने त्यांची उपस्थितीही लक्षणीय होती.

भक्तीगीतांच्या तालावर रामभक्तांनी जल्लोषात सहभाग नोंदवला. शहरातील प्रमुख मार्गांवर मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. अखेर ही मिरवणूक जुन्या पेठेतील श्रीराम मंदिरात पोहोचून भगवा ध्वज चढवून शांततेत सांगता झाली. यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, मिरवणुकीपूर्वी शहरातील दुकाने अचानक बंद केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. याबाबत नागरिक व व्यापाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. पोलीस प्रशासनाने मात्र चोख बंदोबस्त ठेवत मिरवणूक शांततेत पार पाडली.

## घायगावात कार जळाली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**वैजापूर** : शॉर्ट सर्कीटमुळे कार जळुन खाक झाल्याची घटना तालुक्यातील घायगाव येथे मंगळवारी सकाळी घडली. धनंजय साहेबराव साळुंके यांनी त्यांची कार (एम एच ५७ -१०९१) ही घरासमोर उभी केली होती. या कारला सकाळी नऊ वाजेच्या सुमारास शॉर्ट सर्कीटमुळे अचानक आग लागली. परीसरातील नागरीकांनी पाणी व मातीच्या सहाय्याने आग विझविण्याचा प्रयत्न केला. परंतु आगीने रौद्ररूप धारण केले. नगर परीषदेच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. परंतु तो पर्यंत कार जळून खाक झाली होती. या प्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात जळीताची नोंद घेण्यात आली आहे.पुढील तपास हवालदार किसन गवळी हे करीत आहेत.

## नीलम गोऱ्हेंचा आदेश सभापती राम शिंदेंकडून रद्द
### सातार्‍याचे एसपी तुषार दोशींचे निलंबन मागे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई** : सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणुकीवरुन भाजप आणि शिवसेनेत जोरदार राडा झाला. अधिवेशन काळात विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात शिवसेना नेते तथा मंत्र्यांनी जोरदार भाषण करत साताऱ्याचे एसपी तुषार दोशींवर कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर, उपसभापति नीलम गोऱ्हे यांनी तुषार दोशींच्या निलंबनाचे निर्देश दिले. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी उपसभापतींच्या या निर्देशावर कायदेशीर बाजू समाजावत हे निर्देश देण्याच्या अधिकारावर भाष्य केलं होतं. एकीकडे तुषार दोशींच्या निलंबनावर शिवसेना नेते तथा मंत्री ठाम असताना दुसरीकडे उपसभापति नीलम गोऱ्हेंचे आदेश सभापती राम शिंदेंनी रद्द केले आहेत.

त्यावरुन, शिवसेना आणि भाजप नेत्यांमध्ये पुन्हा वादावादी होण्याची शक्यता आहे. त्याच पार्श्वभूमीवर सभागृह तहकूब करण्यात आले. तुषार दोशींच्या निलंबनासंदर्भातील निर्देश आदेशावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज सभागृहात काय घोषणा करतात याकडे शिवसेनेचे लक्ष लागले होते. निलंबन मागे घेतल्यास शिवसेनेकडून तीव्र नाराजी नोंदवण्याची शक्यताही वर्तवली जात होती. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत पोलीस चुकीच्या पद्धतीने वागल्याचा आरोप सत्ताधारी शिवसेना मंत्र्यांनी केला होता. मात्र, आता सभापतींनी राम शिंदे यांनी उपसभापती नीलम गोरे यांचे एस.पी. तुषार देशी यांच्या निलंबनाचे दिलेले आदेश कक्षेबाहेर असल्याचं सांगितलं. नीलम गोहे यांनी निलंबनाचे आदेश दिले होते ते आदेश सभापती राम शिंदे यांनी मागे घेत आता चौकशीचे आदेश दिले आहेत तर, उपसभापतींना विधिमंडळ परिसरात असलेल्या घटनेबाबत पीठासीन अधिकाऱ्यांना निर्णय देण्याचा अधिकार असतो, असे देखील सभापतीने नमूद केलं.

त्यानंतर, शिवसेना मंत्र्यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केल्याने गोंधळ निर्माण होऊन सभागृह तहकूब करण्यात आले. तुषार दोशींचे निलंबन झाले की नाही? असा सवाल मंत्री शंभुराजे देसाई केला. तसेच, निलंबन केलं की नाही ते सांगावे नाहीतर आम्ही कोर्टात जाऊ, असे शशिकांत शिंदेंनी म्हटले. त्यावर आता बोलणे उचित नाही, असे उत्तर सभापती राम शिंदे यांनी दिले. त्यानंतर, सातारा प्रकरणावरून विधानपरिषदेचे कामकाज अर्धा तास तहकूब करण्यात आले. शिवसेना नेते तथा मंत्री उदय सामंत, शंभुराजे देसाई, शशिकांत शिंदे यांनी आक्षेप घेतला. या आक्षेपानंतर विधानपरिषदेचे कामकाज तहकूब करण्यात आले. दरम्यान, या टोकाच्या वादातून मंत्री किंवा आमदार राजिनामाअस्त्र बाहेर काढणार का? याकडे आता लक्ष लागले आहे.

## कोल्हारमध्ये हॉटेलवर छापा;
### वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश, दोघे ताब्यात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : कोल्हार परिसरातील एका हॉटेलवर पोलिसांनी छापा टाकून अवैध वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश केला. या कारवाईत दोन परप्रांतीय महिलांची सुटका करण्यात आली असून दोन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे, तर एक आरोपी पसार झाला आहे. दि. २३ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास हॉटेल न्यू प्रसाद येथे वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर अहिल्यानगर पोलिस पथकाने कारवाई केली. पोलीस निरीक्षक हमीद शेख यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने हॉटेलवर धाड टाकून झडती घेतली असता दोन महिलांना जबरदस्तीने या व्यवसायात ढकलल्याचे समोर आले. याप्रकरणी हॉटेल मालक वसंत रघुनाथ लोंढे, मॅनेजर प्रसाद वसंत लोंढे व दलाल हरिष विनायक जाधव यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी दोघांना अटक करण्यात आली असून प्रसाद लोंढे व दोन महिला अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले आहेत. महिला पोलीस कर्मचारी अर्चना काळे यांच्या फिर्यादीवरून अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

## श्रीरामपूर तहसीलदारांचा वाळू माफियांना दणका, ट्रॅक्टर जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील अवैध धंद्यांविरुद्ध महसूल विभागाने आपली आक्रमक मोहीम सुरूच ठेवली असून प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांच्या आदेशानुसार, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली मातुलठाण येथे गोदावरी नदी पात्रातून अवैध वाळूची वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर भरारी पथकाने रंगेहाथ पकडला असून, वाळू माफियांमध्ये या 'धुरंधर' कारवाईमुळे मोठी खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, महसूल विभागाच्या पथकाने मौजे मातुलठाण येथील गोदावरी नदी पात्रात सापळा रचला होता. यावेळी ट्रॅक्टर क्रमांक एम.एच. १७ सी.एक्स. ७६१२ हा अनधिकृतरीत्या वाळूची वाहतूक करताना आढळून आला. पथकाने तातडीने झडप घालत हा ट्रॅक्टर ताब्यात घेतला. सदर वाहन सध्या श्रीरामपूर तहसील कार्यालयाच्या आवारात जमा करण्यात आले असून सहा. महसूल अधिकारी अशोक नरोड यांनी पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. या धडक कारवाईत महसूल विभागाचे 'धुरंधर' व अनुभवी मंडळ अधिकारी प्रशांत ओहोळ, ग्राम महसूल अधिकारी प्रदीप चव्हाण, तुषार आगळे, सुरेंद्र पवार, राहुल साठे, गोविंद खैरनार यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. या धडाकेबाज कारवाईमुळे तालुक्यातील वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत.

## मारहाण करून दरोडा टाकणारी टोळी जेरबंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : धामणगाव पाट येथील घरफोडी व दरोडा प्रकरणात पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपास करत तिघा आरोपींना अटक केली आहे. या आरोपींनी नाशिक व पुणे जिल्ह्यातही अशाच प्रकारचे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. दि. १९ मार्च रोजी पहाटे एकच्या सुमारास सुरेखा माधव भोर यांच्या घरी पाच अज्ञात इसमांनी दरवाजा तोडून प्रवेश केला. घरातील सदस्यांना धमकावून सोन्याचे दागिने व मोबाईल असा सुमारे १ लाख १० हजार रुपयांचा



ऐवज लुटून आरोपी फरार झाले होते. याप्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करत सुरेगाव (ता. श्रीगोंदा) येथील बबुशा पिंग्या काळे, शुभम काळे व रवी भोसले यांना अटक केली. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. दरम्यान, आरोपींनी दिंडोरी (जि. नाशिक) येथेही २३ मार्च रोजी दरोडा टाकून कुटुंबीयांना मारहाण केल्याचे समोर आले आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक मोहन बोरसे करीत आहेत.

## आश्वी पोलिसांचा दणका
### संघटित गुन्हेगारी टोळीवर 'कलम १११' अंतर्गत कारवाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : आश्वी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दहशत माजवणाऱ्या संघटित गुन्हेगारी टोळीवर पोलिसांनी मोठी कारवाई करत भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १११ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत मुख्य आरोपी रविंद्र उर्फ बंटी मदने याच्यासह साथीदारांना अटक करून जेलमध्ये रवानगी करण्यात आली आहे.

> आरोपींनी आर्थिक फायद्यासाठी संघटित टोळी बनवून गुन्हे केले आहेत. कलम १११ अंतर्गत कारवाईमुळे आरोपींना सहज जामीन मिळणार नाही. नवीन कायद्यामुळे गुन्हेगारांवर निश्चितच वचक बसेल.
> **सोमनाथ वाघचौरे, अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर**

११ ऑगस्ट २०२४ रोजी आश्वी बुद्रुक येथील दाढ रोडवरील पेट्रोल पंपाजवळ फिर्यादी व त्यांच्या मित्रांवर आरोपींनी वाद घालत लाठ्या, काठी व लोखंडी गजाने हल्ला केला होता. तसेच २५ ते ३० हजार रुपये जबरदस्तीने हिसकावून चाकूने भोसकण्याची धमकी दिली होती. या प्रकरणातील बंटी मदने, वसीम शेख व तुषार सोनवणे यांच्यावर यापूर्वीही मारहाण, दरोडा यांसारखे गंभीर गुन्हे नोंद आहेत. बंटी मदने हा टोळीचा प्रमुख असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या गुन्ह्याच्या गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी संघटित गुन्हेगारी अंतर्गत कलम १११ लागू केले असून, या कायद्यानुसार आरोपींना कठोर शिक्षा होऊ शकते. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

## अक्षय कर्डिलेंच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील उंबरे येथे विविध मान्यवरांसह अनेक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने पक्षात प्रवेश केला. युवा नेते अक्षय कर्डिले यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला असून, यामुळे स्थानिक राजकारणात नवचैतन्य निर्माण झाले आहे. या वेळी बाबासाहेब ढोकणे, दत्तात्रय ढोकणे (सचिव), विठ्ठल ढोकणे, गाडगे बाळासाहेब, सुयभान नाना ढोकणे, छगन दुशिंग, सुधाकर ढोकणे, केरू ढोकणे, नाना भाऊ दुशिंग, अशोक शिरसागर, बाबासाहेब दुशिंग, मच्छिंद्र ढोकणे, राजेंद्र ढोकणे आदींनी पक्षात प्रवेश केला.तसेच युवा वर्गातून तुषार दुशिंग, सत्यजित ढोकणे, अक्षय ढोकणे, विशाल खंडागळे, समर्थ ढोकणे, ओम ढोकणे, वैभव खंडागळे, मयूर ढोकणे, भैया ससे, महेश साबळे, यश आडसुरे यांचाही उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.



अक्षय कर्डिले म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या काही वर्षांत विविध विकासकामांच्या माध्यमातून देशाची प्रतिमा जागतिक स्तरावर उंचावली आहे. निवडणूक सुरू असल्याने पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सजग राहून काम करण्याची गरज आहे. आपण गेल्या काही वर्षांत केलेल्या कामांचा लेखाजोखा नागरिकांपर्यंत पोहोचवणे महत्त्वाचे आहे.

केवळ गोड बोलून मते मिळत नाहीत, तर नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन, केंद्र व राज्य सरकारच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. आम्ही जनतेसाठी जीवाचे रान करून काम करतो. त्यामुळे केलेल्या कामांची आठवण नागरिकांना करून देणे ही काळाची गरज आहे, असेही कर्डिले यांनी नमूद केले या पक्षप्रवेशामुळे उंबरे परिसरात भाजप पक्षाची ताकद वाढली आहे असे मत अक्षय कर्डिले यांनी यावेळी व्यक्त केले आहे.

## शिर्डीत श्री रामनवमीचा जल्लोष
### आज मंदीर रात्रभर खुले



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने आयोजित श्री रामनवमी उत्सवास आज उत्साही व भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली. श्री साईबाबा समाधी मंदिर व परिसरात करण्यात आलेल्या विद्युत रोषणाई व फुलांच्या सजावटीने भाविकांचे लक्ष वेधुन घेतले. आज उत्सवाच्या प्रथम दिवशी पहाटे ०५.१५ वाजता श्रींची काकड आरती झाल्यानंतर श्रींची प्रतिमा, पोथी व विणाची मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी पोथी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांनी विणा घेऊन तर प्रशासकिय अधिकारी संदीपकुमार भोसले व अतुल वाघ यांनी प्रतिमा घेवून सहभाग घेतला. यावेळी मंदीर विभाग प्रमुख विष्णु थोरात,जनसंपर्क अधिकारी दीपक लोखंडे, मंदिर पुजारी, शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्सवाचे निमित्ताने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व त्यांच्या सुविद्य पत्नी वंदना गाडीलकर यांच्या हस्ते श्रींची पाद्यपूजा करण्यात आली. प्रथम दिवशी अखंड पारायणासाठी व्दारकामाई मंदिर रात्रभर खुले राहणार आहे. यावर्षी उत्सवाच्या निमित्ताने साईभक्त वेंकट सुब्रमण्यन, बैंगलोर यांच्या देणगीतून मंदिर व परिसरात केलेली फुलांची आकर्षक सजावट, व्दारकामाई मंडळ यांचे वतीने करणेत आलेली आकर्षक विद्युत रोषणाई व ४ नंबर प्रवेशव्दाराचे आतील बाजुस करणेत आलेल्या श्रीसाई मयुर द्वार या भव्य काल्पनिक देखाव्याने साईभक्तांचे लक्ष वेधुन घेतले. दरवर्षीप्रमाणे मुंबई व राज्यातील अनेक भागातून आलेल्या पालखी पदयात्री भाविकांनी उत्सवात हजेरी लावली.